मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | बुधवार, ११ जून २०२५ | वर्ष: १० | अंक: ४२ | पाने-८ | किंमत रु. २ + वितरण खर्च रु. १ एकूण रु.३


## फडणवीसांची नितेश राणेंना कठोर शब्दांत समज

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

नितेश राणे यांनी केलेल्या विधानानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर शब्दांत समज दिल्याचे समजते. राज्यात भाजपाचे सरकार असून, सगळ्यांचा बाप म्हणून भाजपाचा मुख्यमंत्री बसलाय हे सगळ्यांनी लक्षात ठेवा, असे नितेश राणे यांनी म्हटले होते. पत्रकारांशी संवाद साधत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नितेश राणे यांनी केलेल्या विधानाबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर, कोणाचाही बाप काढणे चुकीचे आहे. त्यामुळे संबंधित मंत्र्यांशी चर्चा केली आहे. त्यांनी स्वतः याबाबत मला सांगितले की माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता. त्यावर मी त्यांना सांगितले की, तुमच्या मनात काहीही अर्थ असला तरी राजकारणात लोकांमध्ये त्या वक्तव्याचा काय अर्थ जातो, ते अधिक महत्त्वाचे असते. त्यामुळे कोणत्याही नेत्याने अशा प्रकारे बोलणे योग्य नाही. ही बाब त्यांनी मान्य केली आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले.

अग्रलेख

## खरीखरी

### पक्षांची कथा की, राजकारणी व्यथा

सध्या महाराष्ट्रात महाबहुमत असलेले महायुती सरकार आसनस्थ आहे. त्या सरकार जवळ इतके प्रचंड बहुमत आहे की, त्या बहुमतामुळे सरकारला अजीर्ण होण्याची पाळी आलेली आहे. या तीन पक्षांच्या सरकार बरोबर एक चौथा पक्षही आहे. तो अपक्ष आमदारांचा आहे. काठावरचे बहुमत असले म्हणजे अपक्षांची चांदी असते. पण या ठिकाणी सगळे विरोधी पक्षच काठावर आहेत. सरकारमध्ये सामील असलेले दोन पक्ष हे मूळ पक्षातून निघालेले आहेत. सध्याच्या मूळ पक्षाचा ग्रास घेऊन ते सत्तासुख उपभोगत आहेत. यापैकी शिवसेना म्हणजे शिंदे सेना यांचे नेतृत्व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतात. ती आज तरी चांगलीच फार्मात आहे. बाकी असलेली शिवसेना उद्धव ठाकरे यांच्याकडे आहे. उद्धवरावांना ही शिंदे यांची शिवसेना डोळ्यासमोर नकोशी आहे. मुंबई शहरात मराठी माणसांच्या हितासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी 1966 सालामध्ये आपल्या संघटनेचा पाया रचला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रगण्य नेते प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांनी आपल्या पुत्राच्या संघटनेचे नाव शिवसेना असे ठेवले. देशातील अनेक कौटुंबिक पक्ष सध्यातरी चार कुटुंबाकडे आहेत. त्यात तामिळनाडूचा द्रमुक असो, उत्तर प्रदेश मधील समाजवादी पक्ष असो किंवा बिहार मधील जनता दल असो. यासारखे कुटुंबप्रधान पक्ष त्या-त्या कुटुंबाच्या वारसदारांकडे वारसा हक्काने आलेले आहेत. आज महाराष्ट्रातील शिवसेना काय किंवा राष्ट्रवादी काँग्रेस काय, हे दोन्ही पक्ष मोठ्या बहुमताने बाहेर पडले. पण 'असुनी खास मालक घरचा' तो मात्र वळचणीवरच थांबला. आता कोणे एकेकाळी शिवसेनेचे भविष्य म्हणून ज्यांचे नाव घेतले जात होते. ते राज ठाकरे स्वर्गीय बाळासाहेब या भूतलावर असतानाच प्रचंड नाराज झाले. मग त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा पक्ष प्रसूत केला. या पक्षाने सुरुवातीला तेरा आमदार निवडून आणून चांगलाच दबदबा निर्माण केला होता. पण आता राजसाहेबांचा भाव आणि प्रभाव कायम असूनही निवडणुकीच्या रिंगणात त्यांना डाव काही साधता आलेला नाही. तिकडे राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षात फूट पडल्यावर लोकसभेत मोठ्या साहेबांचा डंका वाजला. पण विधानसभेत त्याच पक्षाची लंका अगदी जळूनच गेली. आता त्याच पक्षांमध्ये बेरजेची भाषा केली जात आहे. ओरिजनल शिवसेनेला( बडे मनसे )मनसे आपल्याबरोबर हवा आहे. तिकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांना आता एक्य हवे आहे. या दोन्ही पक्षांच्या एक्यामध्ये सध्या ज्यांच्या हातात शिवसेना आहे. त्या एकनाथ शिंदे यांना दोन्ही पक्षांकडून फारशी विचारणा नाही, अशा वार्ता आहेत. अशा परिस्थितीत राजसाहेब आणि उद्धव साहेब यांचे मनोमिलन, युती किंवा एकत्रीकरण झाल्यावर भविष्य काळात काय काय होऊ शकते. याचे आडाखे व तडाखे सुरू आहेत. एकत्रीकरणवादी म्हणतात प्रचंड फरक पडेल. बाकीचे असे म्हणतात की, काहीच फरक पडणार नाही. आता या बाबतीतील खरेखोटे शिवसैनिक आणि मनसैनिकच जाणत असतील. तिकडे राष्ट्रवादी पक्षातील अध्यक्षपदाची खुर्ची ज्या जयंत पाटलांकडे आहे. त्यांनाही अध्यक्षपद रिकामे करावयाचे आहे. पण हे पद द्यावे कुणाकडे, याचा निर्णय होत नसल्यामुळे मोठ्या पवार साहेबांनी तीन महिने जयंतरावांना धीर धरण्यास सांगितलेले आहे. पण काही कार्यकर्ते इतके अधीर आहेत की, त्यामुळे त्यांनी पुरते बधीर होण्यापूर्वी काहीतरी चमत्कार होणे, सध्या गरजेचे वाटते. शिवसेनेचे बंधुद्वय आणि राष्ट्रवादी यांचे पक्षद्वय यांच्या बाबतीत सध्या घोळात घोळ चालू आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला. तर लोकसभा आणि विधानसभा यांच्यातील मित्रपक्ष आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मित्रपक्ष वेगवेगळे असतात. स्थानिक तडजोडी करून अनेक आघाड्या मोठमोठ्या पक्षांवर सहज विजय मिळवतात. असा आजवरचा आपला अनुभव आहे. महाराष्ट्र भाजपा मधील सर्वेसर्वा म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या बलाढ्य विजयामुळे आता त्या पक्षाकडून भरपूर अपेक्षा आहेत. येणाऱ्या निवडणुकीमध्ये या पक्षाची गत लोकसभेसारखी होऊ नये. म्हणून देवेंद्रजींना कंबर कसावी लागेल. ती त्यांनी कसली असेलच. त्यामुळे येत्या एक ते दीड महिन्यात महाराष्ट्रात किती आघाड्या व किती बिघाड्या आहेत किंवा होणार आहेत. याचे मनोरंजक किस्से धडाधड धडाधड बाहेर पडतील, यामध्ये तीळमात्र शंका नाही. अशावेळी भविष्याच्या पोटात आणि जनतेच्या गोटात जे काही शिजेल. त्याचे भक्षण करणे एवढेच आपल्या हाती आहे. बाकी अजून काय लिहावे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# 50 टक्के महिलांना निवडून द्या - शरद पवार

**पुणे, दि. १० प्रतिनिधी**



**राष्ट्रवादीला जनतेचा पाठिंबा मिळाला, २६वर्षांपूर्वी आपण एकत्र येऊन पक्ष स्थापन केला. २६ वर्षे लोकांनी सेवेची संधी दिली, अनेकांना पक्षाने संधी दिली. कार्यकर्त्यांमुळे आज हा दिवस साजरा करण्याची संधी मिळत असल्याचे सांगत शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनी आयोजित सोहळ्यात भाषणाला जुन्या आठवणींना उजाळा दिला. शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या जडणघडणीतील सहकाऱ्यांच्या आठवणी काढत भविष्यातील पक्षाच्या वाटचालीवरही भाष्य केलं. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिलांनी संधी देणार असून संधी दिली तर महिला कर्तृत्व दाखवतात. येणाऱ्या निवडणुकीत ५० टक्के महिलांना निवडून द्या, २-३ महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागतील. तर, पहलगाम हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या देशातील व जागतिक परिस्थितीकडे लक्ष वेधले. यावेळी, पवारांनी नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदींवर अप्रत्यक्ष हल्लाबोल केला. आज आमचे पाकिस्तान, चीन, बांग्लादेश सोबत चांगले संबंध नाहीत. बांग्लादेशसाठी भारताने त्याग केला, तो बांग्लादेश देखील आपल्यासोबत नाही, असे पवारांनी म्हटले.**

शरद पवारांनी पक्षाची वाटचाल सांगतान आर.आर. पाटील यांच्या आठवणी जागवल्या. आर.आर. पाटलांनी सामान्य कार्यकर्ता म्हणून कष्ट केले, आबा सामान्य कुटुंबातील होते. सामान्य माणसाला संधी मिळाली की तो कर्तृत्व दाखवू शकतो, ते महाराष्ट्राचा चेहरा बदलण्यासाठी काम करत राहिले. पक्ष सर्व कार्यकर्त्यांच्या कष्टामुळे पुढे आला आहे. जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्याचं काम पक्षाने केलं. पक्षाला मिळालेली प्रतिष्ठा कार्यकर्त्यांच्या कामामुळेच आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये सैन्यातील महिलांनी केलेल्या कामगिरीचा देशाला अभिमान आहे. राष्ट्रहितात मी कधीच राजकारण आणत नाही. देशहितासाठी नेहमीच ठाम भूमिका घेतली, असे शरद पवारांनी म्हटले.

चीनचा वाढता प्रभाव हा चिंतेचा विषय आहे. देशात एक काळ असा होता की, जवाहरलाल नेहरु यांचं नेतृत्व आणि भारत हा सगळ्यांना सोबत घेऊन जाण्यासाठी ओळखला जायचा. आज आमचे पाकिस्तान, चीन, बांग्लादेश सोबत चांगले संबंध नाहीत. बांग्लादेशसाठी भारताने त्याग केला, तो बांग्लादेश देखील आपल्यासोबत नाही. देशाच नेतृत्व करणाऱ्यांनी सुसंवादाची परिस्थिती जाणीपूर्वक निर्माण केलेली नाही, त्याचा परिणाम देश भोगतोय, असे म्हणत शरद पवारांनी नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर टीका केली. राष्ट्रवादी, काँग्रेस आणि डावे पक्ष असतील किंवा इतर पक्ष एकत्र येऊन दिल्लीत सुसंवाद निर्माण केला पाहिजे. कोणी आले आणि गेले तरी फरक पडत नाही, आपण एकसंघ राहिलो तर सत्ता येते हा अनुभव आहे, असेही पवारांनी म्हटलं.

राष्ट्रवादीत फूट पडेल असं कधी वाटलं नव्हतं, कोण पक्षातून गेलं याची चिंता करू नका. सन १९८० नंतर आमची संख्या ६ वरून ७२ झाली. जयंत पाटलांनी १० वर्षे अर्थमंत्री म्हणून काम पाहिले, विरोधी बाकावरही आपण प्रामाणिकपणे काम केले. सत्ता येते जाते, पण पुन्हा सत्तेत येणार हा विश्वास असल्याचे पवारांनी म्हटले.

### जयंत पाटलांची प्रदेशाध्यक्ष पद सोडण्याची इच्छा

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पद सोडण्याची मागणी केली. आपल्याला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करावे अशी विनंती जयंत पाटील यांनी शरद पवार यांच्याकडे केली. यावेळी जयंत पाटील यांच्या समर्थकांनी त्यांच्या विनंतीला विरोध केला. शेवटी शरद पवार यांनी निर्णय घ्यावा असंही जयंत पाटील यांनी म्हटलं. त्यानंतर शरद पवार यांनी केलेल्या भाषणात जयंत पाटील यांना अजून तीन महिने थांबण्याच्या सबुरीचा सल्ला दिल्या.



गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरुन जोरदार चर्चा सुरु होती. यावरुनच पक्षामध्ये काही प्रमाणात नाराजी असल्याच्याही बातम्या समोर आल्या होत्या. त्यानंतर आता जयंत पाटील यांनीच प्रदेशाध्यक्ष पद सोडण्याची इच्छा व्यक्त केली. नव्या चेहऱ्यांना संधी द्या म्हणत जयंत पाटील यांनी शरद पवार यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष पदातून मुक्त करण्याची मागणी केली. यावर आता शरद पवार यांनी भाष्य केले आहे. जयंत पाटील यांच्या मागणीवर बोलताना सामूहिकपणाने या संदर्भातील निर्णय घेऊ असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

"जयंत पाटील यांनी दहा वर्ष संघर्षाचा काळात संघटनेचे काम केले याचा आनंद आहे. त्यांनी वेगळी भूमिका मांडली आहे. जयंत पाटील यांनी मला सांगितलं आहे की आता नव्या पिढीला संधी द्या, तुम्ही आणि आम्ही सगळे त्यांच्या मागे उभे राहूयात. पण तुमची मानसिकता वेगळी आहे ते या ठिकाणी दिसलं. मी एवढेच सांगतो की प्रमुख सहकाऱ्यांना एकत्र घेऊन त्यांच्याशी आम्ही या विषयावर सुसंवाद साधू. सामूहिकपणाने या संदर्भातील निर्णय घेऊ. हा निर्णय घेत असताना प्रत्येक तालुक्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये नवीन चेहरे दिसले पाहिजेत. माझी खात्री आहे की कर्तृत्व असलेले हजारो कार्यकर्ते आज आपल्या पक्षात आहेत. त्यांना संधी देऊया मार्गदर्शन करूया आणि त्यांच्यातून राज्य चालवण्याची कुवत असलेले नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देऊ शकतो हा इतिहास निर्माण करायचा आहे. त्यासाठी तुमच्या सगळ्यांची तयारी असली पाहिजे," असं शरद पवार म्हणाले.

## भाडे न वाढवता सर्व लोकल एसी करणार

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**



मध्य रेल्वेमार्गावरील मुंब्रा स्थानकाजवळ सोमवारी सकाळी झालेल्या लोकल रेल्वे अपघाताच्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर रेल्वे मंत्र्यांची असंवेदनशीलता, अशा आशयाची बातमी पाहिली. मात्र काल(9 जून) रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव माझ्यासोबत अडीच तास चर्चा करत होते. उपनगरातील सर्वाधिक वाढ मोदी सरकारच्या काळात झाली आहे. मेट्रो नेटवर्क न झाल्याने ओव्हरक्राऊडींग झाली आहे. काल बोलताना त्यांनी सांगितलं की, दरवाजे लावण्याचे काम करतोय. सरकारला कळतं व्हेंटिलेशनची व्यवस्था करावी लागेल. तेवढं डिझाईन डोकं सरकारकडे आहे. दरम्यान, एससी ट्रेन द्यायच्या आणि त्या भाडं न वाढवता द्यायचा, असा मास्टर प्लॅन सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील मुंब्रा लोकल दुर्घटनेवर भाष्य केलंय.

दरम्यान, सरकार भाडे न वाढवता एसी लोकल आणण्याच्या तयारीत आहे. एससी ट्रेन द्यायच्या आणि भाडं न वाढवता द्यायचा, तसा प्लान तयार केलेला आहे. मात्र कालच्या घटनेतून आपल्याला शिकावं लागेल. राज्य सरकार आणि केंद्र सरकार यासाठी प्रयत्न करुन मार्ग काढेल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शासकीय कार्यालयांना फ्लेक्सी डायलूट दिलेला आहे. खासगी कार्यालयासंदर्भात अडचण येत आहे. पब्लिक ट्रान्सपोर्टसंदर्भात कपॅसिटी वाढवण्याचा प्रयत्न करु, असेही ते म्हणाले.

## मद्यावर कर वाढविण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी देशात बिअर या मद्याचे दर कमी होणार असल्याचे वृत्त माध्यमांत झळकल्याने मद्यप्रेमींनी आनंद व्यक्त केला होता. मात्र, राज्य सरकारचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीकोनात उत्पादन शुल्क विभाग मद्यविक्रीवर कर वाढविण्याचा विचार करत होते. अखेर, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत दारु विक्रीवर IMFL (कर) वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, मद्यप्रेमींच्या खिशाला झळ बसणार असून त्यांचं दु:ख आणि सेलिब्रेशनही महागणार आहे.

### १८० मिली मद्य किरकोळ विक्रीची किंमत



**देशी मद्य – ८० रुपये**
**महाराष्ट्र मेड लिकर – १४८ रुपये**
**भारतीय बनावटीचे विदेशी मद्य – २०५ रुपये**
**विदेशी मद्याचे प्रीमीयम ब्रॅण्ड – ३६० रुपये**

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे, मद्यावरील शुल्क वाढीमुळे राज्याच्या तिजोरीत १४,००० कोटींचा महसूल वाढणार आहे. मद्यपींना एका क्वार्टरसाठी म्हणजेच १८० मिली दारुसाठी ८० ते ३६० रुपये मोजावे लागतील. त्यामध्ये, देशी दारु ८० रुपयांना १८० मिली मिळणार आहे. तर, विदेशी प्रिमियम ब्रँड ३६० रुपये १८० मिली असेल.

राज्याच्या महसुलात वाढ करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्यविक्रीवरील करत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर (IMFL) १.५ टक्याने वाढविण्यात आला आहे. त्यासह, विदेशी मद्यावरही हा कर वाढविण्यात आल्याने आता मद्यप्रेमींसाठी हा निर्णय खिशाला झळ देणारा आहे.

सोबतच सीलबंद विदेशी मद्यविक्री हॉटेल आणि रेस्टॉरंट कराराद्वारे भाडेतत्त्वावरती चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यावर १० ते १५ टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. उत्पादन शुल्क विभागाला बळकटी देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागात १२२३ पदं नव्याने भरले जाणार आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभाग अंतर्गत मुंबई शहर आणि उपनगर यासाठी नव्याने विभागीय कार्यालय सुरू करणार असल्याची माहितीही समोर आली आहे. तसेच, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर आणि अहिल्यानगर या ६ जिल्ह्यांसाठी नव्याने अधीक्षक कार्यालय सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली. उत्पादन आणि विक्रीसाठी विभागाच्या माध्यमातून एआय आधारित कंट्रोल रूम तयारी केली जाणार आहे.

दरम्यान, देशात विकली जाणारी ब्रिटिश बिअर ७५ टक्क्यांपर्यंत स्वस्त होणार असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी झळकले होते. भारत आणि ब्रिटनमधील एफटीए अंतर्गत आयात शुल्क कमी करण्याचा करार झाल्याने ही बिअर स्वस्त होणार होती. मात्र, आता राज्यात दारुचे दर वाढल्याचं सत्य मद्यपींना पचवावे लागेल.

## पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ३३७३० रूपये विद्यावेतन मिळणार

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार मंत्रालयात पार पडली. या बैठकीत सामाजिक न्याय विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर सदस्य उपस्थित होते.

शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता प्रशिक्षण काळात दरमहा १ हजार ७५० रुपये विद्यावेतन मिळत होते. यामध्ये ६ हजार २५० रूपयांची वाढ करून त्यांना दरमहा ८ हजार रूपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. तर याच अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना महागाई भत्त्यासह १० हजार रूपये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या वाढीनंतर पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ३३ हजार ७३० रूपये इतके विद्यावेतन मिळणार आहे.ही वाढ १ जून २०२५ पासून मिळणार आहे. केंद्र शासनामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग कार्यरत आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याशी निगडीत विषय वेगवेगळे असल्याने या दोन्हींकरिता स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची शिफारस केंद्रीय जनजाती परिषदेने केली आहे. त्यानुसार राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आले आहेत. आजच्या बैठकीत राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने, तयार करण्यात आलेल्या विधेयकाच्या प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच या आयोगाकरिता निर्माण केलेल्या २७ पदांना आयोगाच्या आस्थापनेवर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

## मी काय माझ्या खिशातील पैसे देतो का?

### नाव न घेता अजित पवारांचा शिंदेंच्या आमदारांना टोला

**पुणे, दि. १० प्रतिनिधी**

काही जण म्हणतात की अजितदादा पैसे देत नाहीत, निधी देत नाहीत. अरे पण मी माझ्या खिशातले पैसे देतो का? एकदा अर्थसंकल्प मांडला की त्यासाठी टप्प्याटप्प्याने पैसे दिले जातात. निधी काही एकदम दिला जात नाही असं स्पष्टीकरण राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं. समाजकल्याण विभागाचा निधी वळवल्याचा आरोप केला जातो, पण गेल्या वर्षीच्या तुलनेत त्या विभागाला ३८ टक्के जास्त निधी दिला असंही अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचा २६वा वर्धापनदिन साजरा झाला. त्यानिमित्ताने अजित पवार बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, "काहीजण सतत बदनामी करत आहेत. सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला. ७ लाख कोटी रुपये अर्थसंकल्प जाहीर करताना ४१ टक्के निधी आदिवासी समाजाला दिला. पण खोटी माहिती देऊन आरोप केले जातात. यामुळे कार्यकर्ता चलबिचल होतो. मागील वर्षाच्या तुलनेत ३८ टक्के जास्त निधी यंदा दिला आहे. मुख्यमंत्री देखील याबाबत बोलले. मात्र त्याला पाहिजे तशी प्रसिद्धी मिळाली नाही."

विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही.



ज्या दिवशी विचारांशी तडजोड होईल त्यावेळी पक्षाचा पाया कमकुवत होईल. ही लढाई विचारांची आहे आणि विचारांनीच लढली जाईल असं अजित पवार म्हणाले. भुजबळ आणि दत्ताभाऊ भरणेंचा परदेश दौरा ठरलेला होता. दिलीप वळसे पाटलांची तब्येत ठिक नाही. त्यामुळे हे तीनही नेते वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत अशी माहिती अजित पवारांनी दिली.

यंदाचा ७.२० लाख कोटींचे बजेट मांडण्यात आलं. त्यामध्ये ४१ टक्के निधी हा अनुसूचित विभागाला देण्यात आला आहे. गेल्या वर्षी दिलेल्या निधीपेक्षा ३८ टक्के निधी जास्त दिला आहे. पण कुणीतरी म्हणतंय की अजितदादांनी निधी दिला नाही. पण ते जाणिवपूर्वक बदनामी करतात.

लोकसभेला मागच्या वर्षी केवळ ४ जागा मिळाल्या. एकत्र काँग्रेस असताना मला १९९१ साली खासदारकीच तिकीट मिळालं. लोकसभेला आपला पराभव झाला त्यावेळी लोकांची नाराजी दूर करणं हे काम होतं. त्यावेळी लाडक्या बहिणीचा विचार समोर आला. सगळे सोंग करता येतं परंतु पैशाचं सोंग करता येत नाही. त्यामुळे ४० ते ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय झाला.

कधी कधी बातम्या येतात अजित पवार पैसे सोडत नाही. मी काय माझ्या खिशातील पैसे देतो का? मागच्या आठवड्यात अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यात आला. आजच्या बैठकीत हा दर्जा देण्यात आला. सीमा भागातील मराठी माणसांना सांगू इच्छितो की शिव शाहू फुले आंबेडकर विचारधारा पुढे घेऊन जाणारा हा पक्ष आहे. भाजप सोबत गेला म्हणून टीका करतात. परंतु आधी पण निर्णय घेतला होता. लोकांना दिशा देणारे विकास करणारे आणि बेरजेचे राजकारण करणारे आपण लोक आहोत. चंद्राबाबू नायडू देखील एनडीएमध्ये आले, आपण देखील निर्णय घेतला.

## प्रकाश महाजन यांना मारून कोण ३०२ अंगावर घेईल? - नारायण राणे

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

संपलेल्या माणसांवर मी बोलणार नाही. मला त्यांच्या कुठल्याच प्रश्नाला उत्तर द्यायचे नाही. संपलेल्या माणसांना मला संजीवनी द्यायची नाही. त्यांच्यात काय दम आहे, ते मी पाहिले आहे, ते ठाकरे यांच्या यांची बाजू लावून धरतात की नाही, हे मला माहीत नाही. महाजन यांना कोण कशाला मारेल. त्यांना मारून कोण ३०२ अंगावर घेईल, असा टोला माजी केंद्रीय मंत्री व भाजप नेते नारायण राणे यांनी मनसे नेते प्रकाश महाजन यांना लगावला. ते दिल्लीत आज पत्रकारांशी बोलत होते.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची चर्चा राज्याच्या राजकिय वर्तुळात सुरू आहे. यावर राणे म्हणाले की, मी त्यांना अनेक वर्ष ओळखत आहे. ते दोघे एकत्र येऊ द्या, त्यांना चांगले नांदू द्या, लोकांना बंधू प्रेम दाखवून द्या. ते दोघे एकत्र आले तरी राजकारणात काही फरक पडणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका समोर असल्याने त्यांच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दुसरे काहीही नाही. याबाबत मी राज ठाकरे यांना काहीही सल्ला देऊ शकत नाही. ते परिपक्व राजकारणी आहेत. त्यांना सगळे समजते. दोघे भाऊ किती दिवस एकत्र राहतील, या प्रश्नावर नो कॉमेंट करत त्यावर पत्रकार विश्लेषण करतील, असे राणे यांनी सांगितले.

## माझ्यावर हल्ला झाल्यास अजित पवार जबाबदार राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून धमक्या - लक्ष्मण हाके

**पंढरपूर, दि. १० प्रतिनिधी**



ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादीतील वाकयुद्ध सुरूच असून गेल्या काही दिवसांपासून लक्ष्मण हाके चर्चेत आहेत. आंदोलक लक्ष्मण हाके यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. अजित पवार यांनी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचे सांगत गंभीर आरोपही केले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व आमदारांनी लक्ष्मण हाकेंवर पलटवार केला. आमदार अमोल मिटकरी यांनी काही शब्दप्रयोग करत हाकेंना लक्ष्य केलं. दरम्यान, आजही त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर निशाणा साधला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६ वा वर्धापन दिन आहे. यातच आता लक्ष्मण हाके यांनी एक पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. या पोस्टची चर्चा असतानाच राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या धमक्यांवरून ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील असा थेट इशाराच दिलाय.

मला रोज महाराष्ट्रातून राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचे धमक्या मिळू लागल्या असून मी गावगाड्यातील मेंढपाळाचा पोरगा आहे मी अशा धमक्यांना भीक घालत नाही मात्र माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. हाके यांना राष्ट्रवादीच्या विविध पदाधिकाऱ्यांकडून धमकीचे फोन आणि इशारे येऊ लागले असून यासंदर्भात पोलिसांकडूनही गृह विभागाकडे अहवाल गेल्याचे हाके यांनी सांगितले. ते म्हणाले, अजितदादा तुमच्या पिसाळलेल्या कुत्र्यांना आवर घाला. जर माझ्या केसाला धक्का लागला तर तुम्हाला रस्त्यावर आणू असा इशारा लक्ष्मण हाकेंनी दिला आहे.

## पेरण्यांची घाई नको, १५ जून नंतरच मोसमी पाऊस

### कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**



राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'राज्यातील सर्व भागात पंधरा जून मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसाची मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

## शॉक लागून शेतकऱ्यासह दोन लहान मुलांचा मृत्यू

**जालना, दि. १० प्रतिनिधी**

सध्या पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांकडून शेतातील कामे आटोपली जात आहेत. शेतात पेरणीसह पावसाळ्यापूर्वीची खरीप हंगामाची कामे करण्यासाठी शेतकरी कुटुंबासह शेतात जात आहेत. मात्र, याच शेतीकामासाठी गेलेल्या एका शेतकरी कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. शेतकाम करत असताना विद्युत तारेचा स्पर्श होऊन पित्यासह दोन लहान मुलांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. विनोद मस्के असे वडिलांचे नाव असून मुलगा समर्थ आणि मुलगी श्रद्धा मस्के या दोन लहान्यांनाही आपला जीव गवमावा लागला आहे. जालना तालुक्यातील वरुड गावात शेतकाम करत असताना वडिलांना विद्युत तारेचा जोरदार शॉक बसला. त्या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे.

जालना जिल्ह्यातून हृदयद्रावक घटना समोर आली असून विजेचा धक्का लागल्याने बाप आणि दोन चिमुरड्यांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. या घटनेत विनोद मस्के आणि त्यांचा मुलगा समर्थ आणि मुलगी श्रद्धा मस्के यांचा मृत्यू झाला. दरम्यान, घटनेची माहिती कळताच गावकऱ्यांना तिघांनाही तात्काळ जालना शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं होतं. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केलं. सध्या तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी जालना सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे वरुड गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# नीट-पीजी 3 ऑगस्टला; 13 ते 17 जूनदरम्यान भरता येणार पसंतीक्रम

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

दोनऐवजी एका सत्रात परीक्षा घेण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढे ढकलण्यात आलेल्या पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या (नीट-पीजी) परीक्षेची तारीख नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सकडून (एनबीईएमएस) जाहीर करण्यात आली. त्यानुसार नीट-पीजी परीक्षा ३ ऑगस्ट रोजी होणार आहे. यासाठी परीक्षा केंद्र पसंतीक्रम नोंदविण्यासाठी १३ ते १७ जूनपर्यंत मुदत देण्यात येणार आहे.

पर्सेंटाईलमुळे होणारा गोंधळ लक्षात घेत वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी नीट-पीजी परीक्षा देणाऱ्या दोन ऐवजी एका सत्रात घेण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एनबीईएमएसने नीट-पीजी परीक्षा एकाच सत्रामध्ये घेण्याचा निर्णय घेत ही परीक्षा ३ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. परीक्षा एकाच सत्रामध्ये घेण्यासाठी एनबीईएमएसने परीक्षा केंद्र असलेल्या शहरांमध्ये वाढ केली आहे.

तसेच सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे परीक्षा केंद्र निवडण्यासाठी शहर निवडण्यासाठी पुन्हा अर्ज करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांना १७जून रोजी रात्री ११ वाजून ५५ मिनिटांपर्यंत शहरांचा पसंतीक्रम भरता येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी निवडलेल्या शहरातील परीक्षा केंद्राची एनबीईएमएसद्वारे वाटप करण्यात येणार आहे. परीक्षेसाठीच्या शहरांची निवड ही प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जामध्ये नाव, श्रेणी, राष्ट्रीयत्व, ईमेल, मोबाईल नंबर आणि परी-क्षेचे शहर वगळता अन्य माहिती व कागदपत्रे संपादित करण्यासाठी २० ते २२ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना २१ जुलै रोजी परीक्षा शहराची माहिती कळविण्यात येणार आहे. त्यानंतर ३१ जुलै रोजी विद्यार्थ्यांना प्रवेश पत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्राची माहिती देण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचा निकाल ३ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

# गोराई मॅन्ग्रोव्ह पार्क जुलैमध्ये पर्यटकांसाठी होणार खुला

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**




उत्तर मुंबईतील बोरिवली येथील गोराई गावात ८ हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या गोराई मॅन्ग्रोव्ह संवर्धन केंद्र आणि उद्यानाच्या उद्घाटनाची तारीख निश्चित करण्यात आली आहे. सुमारे ३३.४३ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प पुढील महिन्यात जुलैमध्ये पर्यटकांसाठी खुला करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र सरकार हे उद्यान ८ हेक्टर म्हणजेच १९.७६ एकरमध्ये विकसित करत आहे. या उद्यानात नेचर इंटरप्रिटेशन सेंटर (एनआयसी), मॅन्ग्रोव्ह ट्रेल, बर्ड ऑब्झर्व्हेटरी आणि कायाक ट्रेल इत्यादींचा समावेश आहे. मॅन्ग्रोव्ह ट्रेलमध्ये ८०० मीटर लांबीचा पदपथ आहे जो पर्यटकांना मॅन्ग्रोव्ह जंगलातून घेऊन जाईल. उद्यानाचे काम अंतिम टप्प्यात आहे. यापूर्वी ते मे महिन्यात उघडण्याची अपेक्षा होती, जी जून महिन्यापर्यंत वाढवण्यात आली. आता फक्त फिनिशिंगचे काम शिल्लक असल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्र वन विभागाच्या मते, प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. अंतिम आकार दिला जात आहेत. जर सर्व काही नियोजनाप्रमाणे झाले तर ते या महिन्यात पूर्ण होईल. यानंतर, जुलै महिन्यात हे उद्यान सर्वसामान्यांसाठी खुले केले जाईल.

**५० किमी पेक्षा जास्त लांबीचा खारफुटीचा प्रदेश**

निसर्गप्रेमी या उद्यानाच्या उद्घाटनाची आतुरतेने वाट पाहत आहेत. गोराई खाडीत बांधलेल्या वॉचटॉवरवरून उद्यानाचे सुंदर दृश्य दिसते. त्याचप्रमाणे, खारफुटीच्या जंगलातून जाणाऱ्या ७४० मीटर लांबीच्या बोर्डवॉकवर चालण्याचा आनंद वेगळाच असेल. हे मुंबईतील अशा प्रकारचे पहिलेच मॅन्ग्रोव्ह पार्क असेल, जे केवळ पर्यटनाला चालना देणार नाही तर सागरी जीव आणि निसर्ग संवर्धनाबद्दल जागरूकता देखील पसरवेल. मुंबईचा ५० किलोमीटरहून अधिक परिसर खारफुटीच्या जंगलांनी व्यापलेला आहे. हे उद्यान लोकांना खारफुटी आणि जलचरांचे संवर्धन आणि महत्त्व समजावून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

**७४० मीटर लांबीचा बोर्ड वॉक**

महाराष्ट्र वन विभागाच्या मॅन्ग्रोव्ह फाउंडेशनकडून अद्वितीय इको-टुरिझम विकसित केला जात आहे. दाट खारफुटीच्या जंगलांमधून वळण घेणारा ७४० मीटर लांबीचा बोर्डवॉक आहे, जो एकही झाड न तोडता डिझाइन केलेला आहे. या प्रकल्पाच्या केंद्रस्थानी एक निसर्ग संवर्धन आणि व्याख्या केंद्र आहे, जे एका डंपिंग ग्राउंडला लागून आहे. हे १,५१७ चौरस मीटरचे संकुल आहे. हा प्रकल्प जानेवारी २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु विविध कारणांमुळे ते विलंबित झाले.

# देवनार सर्वात जास्त प्रदूषित

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

धारावी पुनर्वसन प्रकल्पातील बाधित लोकांचे वसाहत करण्यासाठी देवनार डंपिंग ग्राउंडचा काही भाग निवडण्यात आला असला तरी एका अभ्यास अहवालातून असे दिसून आले आहे की हा परिसर सर्वात जास्त प्रदूषित क्षेत्रांपैकी एक आहे. हे डंपिंग साइट विषशास्त्र निर्देशक सुरक्षा मर्यादेपेक्षा चार पट जास्त प्रदूषित आहे.

देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील कचराकुंडीतून बाहेर पडणाऱ्या द्रवांचे विश्लेषण करण्यात आले आहे. हे उच्च स्तर वाढलेली विषाक्तता दर्शवतात. महापालिकेने २०२३ मध्ये अभ्यास सुरू केला होता, ज्यामुळे डम्पिंग ग्राऊंड पुन्हा मिळवण्याच्या दिशेने पहिले पाऊल पडले. हा अभ्यास नॅटेल इंडिया लिमिटेड, एनएम कन्सल्टंट्स-एसकेडब्ल्यू सॉइल अँड सर्व्हे यांच्या सहकार्याने करण्यात आला. अभ्यास अहवालात म्हटले आहे की, निष्क्रिय कचऱ्यामध्ये मोडतोड आणि नॉन-जैवविघटनशील पदार्थांचा समावेश आहे, जे कचऱ्याच्या ३०-५० टक्के आहे. यामुळे कचरा विल्हेवाट आणि व्यवस्थापनासाठी आव्हाने निर्माण होतात. महापालिकेने केलेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, डम्पिंग ग्राऊंडमध्ये विषारी निर्देशकांची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा चार पट जास्त आहे. आयआयटी बॉम्बेचे माजी शास्त्रज्ञ डॉ.तुहिन बॅनर्जी स्पष्ट करतात की उच्च बीओडी, सीओडी आणि टीडीएस पातळी दर्शवते की संपूर्ण




परिसर मोठ्या प्रमाणावर प्रदूषित आहे.

**✦ स्वच्छतेसाठी २,३६८ कोटी रुपयांची निविदा**

देवनार डंपिंग ग्राउंडमधील कचऱ्याचे ढीग बायोमायनिंग प्रक्रियेद्वारे साफ करण्यासाठी महापालिका प्रशासनाने अलीकडेच २,३६८ कोटी रुपयांची निविदा जारी केली आहे. धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत उर्वरित रहिवाशांना स्थलांतरित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. बायोमायनिंग प्रक्रियेत, हवा आणि सूर्यप्रकाशासारख्या नैसर्गिक घटकांच्या मदतीने कचरा पुनर्वापर केला जातो. कधीकधी सूक्ष्मजीव देखील वापरले जातात.

**✦ १२४ एकरवर निवासी इमारती बांधल्या जातील**

ऑक्टोबर २०२४ मध्ये, ३११ एकरच्या देवनार डंपिंग ग्राउंडपैकी १२४ एकर जागा निवासी इमारतींच्या बांधकामासाठी देण्यात आली. यासाठी २७१ एकर जमीन साफ केली जाईल. यामध्ये जमिनीचा तो भाग देखील समाविष्ट आहे जिथे कचरा-ते-ऊर्जा आणि बायो-सीएनजी प्लांट उभारले जाणार आहेत. त्या जमिनीच्या भागातून १८५ लाख मेट्रिक टन कचरा काढला जाईल. या कामासाठी १,२०० वाहने तैनात केली जातील आणि दररोज २,३०० मेट्रिक टन कचरा साफ केला जाईल. संपूर्ण डंपिंग ग्राउंड स्वच्छ करण्यासाठी ३ वर्षे लागतील.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) अहवालानुसार, डंपिंग ग्राउंड मध्ये दर तासाला सुमारे ६,२०० किलो मिथेन वायू तयार होतो, ज्यामुळे देवनार देशातील टॉप 22 मिथेन हॉटस्पॉट पैकी एक बनतो. सीपीसीबीच्या नियमांनुसार, डब्ल्यूटीई प्लांट आणि निवासी क्षेत्रांमध्ये किमान ५०० मीटर अंतर राखले पाहिजे. डंपिंग ग्राउंडच्या सीमेपासून १०० मीटर अंतरावर विकास-विरोधी क्षेत्र राखावे लागेल.

# नव्या वर्षात येणार नव्या बनावटीच्या नॉन एसी लोकल

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

लोकल प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी रेल्वेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जानेवारी २०२६ पर्यंत प्रवाशांच्या सेवेत नवीन बनावटीच्या आणि स्वयंचलित दरवाजाच्या नॉन एसी लोकल दाखल होणार आहेत. मध्य रेल्वेवर सोमवारी घडलेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर, रेल्वेमंत्री आणि रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या (आयसीएफ) टीमबरोबर बैठक घेतली. या बैठकीमध्ये मुंबईतील नॉन एसी लोकल गाड्यांमध्ये स्वयंचलित दरवाजे बंद होण्याच्या समस्येवर व्यावहारिक उपाय शोधणे हा यामागचा उद्देश असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. स्वयंचलित दरवाजांच्या नॉन-एसी लोकलमध्ये प्रवाशांना व्हेंटिलेशनअभावी त्रास होऊ शकतो हे गृहीत धरून या गाड्यांचे डिझाइन तयार केले जाणार आहे.

# गोरेगाव मध्ये 14 वर्षांच्या मुलीची आत्महत्या

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

आई – वडिलांनी मोबाइलमध्ये गेम खेळण्यास विरोध केल्याने १४ वर्षीय मुलीने राहत्या घरात गळफास लाऊन आत्महत्या केली. गोरेगावमधील आरे कॉलनी परिसरात ही घटना घडली. लक्ष्मी यादव असे या मृत मुलीचे नाव आहे. याप्रकरणी आरे पोलिसांनी अपमृत्यूचा गुन्हा केला आहे. गोरेगाव (पूर्व) येथील आरे कॉलनी परिसरात वास्तव्यास असलेल्या लक्ष्मी यादवला (१४) मोबाइलवर गेम खेळायची खूप आवड होती. तासंतास ती मोबाइलवर गेम खेळत असायची. अभ्यासाकडे दुर्लक्ष करून ती मोबाईइवर खेळत रहायची. त्यामुळे तिचे पालक सतत तिला ओरडत होते. लक्ष्मी सोमवारी दुपारी बराच वेळे मोबाइलवर गेम खेळत होती. त्यामुळे पालकांनी तिचा मोबाइल काढून घेतला. यामुळे लक्ष्मी संतापले. रागाच्या भरात ती दुपारी ४ च्या सुमारास आतील खोलीत गेली आणि आतून दरवाजाला लावून घेतला. खोलीतील पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून तिने आत्महत्या केली. हा प्रकार समजताच पालकांनी तिला खाली काढले. मात्र तोपर्यंत ती बेशुध्द झाली होती. तिला उपचारासाठी जोगेश्वरीच्या ट्रॉमा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मोबाइल काढून घेतल्याने मुलीने रागाच्या भरात आत्महत्या केल्याचा जबाब तिच्या पालकांनी दिला. त्यावरून आम्ही अपमृत्यूचा गुन्हा नोंद केला आहे, अशी माहिती आरे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी दिली.

# दक्षिण मुंबईतील काही परिसराला देणार 'हेरिटेज लूक'

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेने दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. दक्षिण मुंबईतील नरिमन पॉईंट, फोर्ट, मरीन ड्राईव्ह, चर्नी रोड, ग्रँट रोड, गेटवे ऑफ इंडिया, ताज हॉटेल परिसर, काळा घोडा आणि आसपासच्या परिसराला पुन्हा एकदा 'हेरिटेज लूक' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे मुंबईला पूर्वीचे वैभव परत मिळवून देण्याचा महापालिकेचा मानस आहे. या कामाची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, दिवाळीपूर्वी या कामाला सुरवात होण्याची शक्यता आहे.

या प्रकल्पामध्ये टप्प्याटप्प्याने कामे सुरू झाली आहेत. इमारतींना साजेसे पदपथ बांधले जात असून, हेरिटेज स्ट्रीट लाईट्सची उभारणी केली जात आहे. मुंबई महापालिका मुख्यालय आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) परिसरातील ब्रिटिशकालीन इमारती, ज्या १०० ते १५० वर्षांहून अधिक जुन्या आहेत, त्यांचे वैभव पुन्हा प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. गेल्या ५० वर्षांत विकासकामांच्या नावाखाली बदललेले पदपथाचे जुने दगड आणि स्ट्रीट लाईट्स बदलून त्यांना मूळ रूपात आणले जाणार आहे.

या कामांमध्ये प्रामुख्याने मालाड दगडाचा वापर करून पदपथ बांधणे, पदपथावर दगडी लाद्या (पेव्हिंग स्टोन्स) वापरणे, वाहतूक बेटांचा विकास करणे, हेरिटेज स्ट्रीट लाईट्स बसवणे, इमारतींना साजेसे रंगकाम करणे आणि इतर संबंधित कामे यांचा समावेश आहे.

सीएसएमटी आणि मुंबई महापालिका मुख्यालयासमोरील रस्त्याचे सुशोभीकरण यापूर्वीच करण्यात आले असून, चर्चगेट ते चर्नी रोडकडे जाणाऱ्या महर्षी कर्वे रोडवरील पदपथ आणि हेरिटेज लूक असलेल्या स्ट्रीट लाईट्स बसवण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर दक्षिण मुंबईतील प्रत्येक रस्त्यावर हेरिटेज लूक असणाऱ्या स्ट्रीट लाईट्स आणि दगडी पदपथ तयार केले जाणार आहेत. यासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

शहर आणि उपनगरातील जुन्या लोखंडी बस स्टॉप आणि बस थांब्यांचे रूपडे बदलण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. याचबरोबर, दक्षिण मुंबईतील फॅशनेबल कपड्यांचा बाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'फॅशन स्ट्रीट'लाही हेरिटेज लूक देण्यात येणार आहे. यामध्ये हेरिटेज स्ट्रीट लाईट्स, दगडी पदपथ, एकसमान स्टॉल्स आणि आजूबाजूच्या परिसराचा विकास यांचा समावेश आहे. या कामाची टेंडर प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, दिवाळीपूर्वी या कामाचा शुभारंभ होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे दक्षिण मुंबईचा ऐतिहासिक वारसा जपला जाईल, तसेच पर्यटक आणि स्थानिक रहिवाशांना पूर्वीच्या मुंबईचा अनुभव घेता येईल, अशी अपेक्षा आहे.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### सहाय्यक अभियंता (परि.) खाते

**विषय :** एल विभागातील प्रभाग क्र. १५६ ते १७१ करीता परिरक्षणसंबधीत विविध कामांसाठी अशासकीय संस्थांमार्फत कामगार / मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता दि. २५.०६.२०२५ ते २४.१२.२०२५ या कालावधीकरीता जाहीरात देऊन सोडतीद्वारे संस्थेची नियुक्ती करण्याबाबत.

### स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

'एल' विभागामध्ये प्रभाग क्र. १५६ ते १७१ मधील परिरक्षणसंबधीत विविध कामाकरीता लागणारे कामगार /मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता प्रत्येक प्रभागासाठी अशासकीय संस्थेची नेमणूक करण्यासाठी 'एल' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. (कामाचा कालावधी दि. २५.०६.२०२५ ते २४.१२.२०२५)

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था (प्रत्येक प्रभागासाठी ) |
|---|---|---|
| १ | एल विभाग प्रभाग क्र. १५६ ते १७१ मध्ये परिरक्षण संबधीत विविध कामासाठी (कामाचा कालावधी दि. २५.०६.२०२५ ते २४.१२.२०२५) लागणारे मनुष्यबळ 1 उपलब्ध करुन देण्याकरिता प्रत्येक प्रभागासाठी संस्थेची नियुक्ती करणे. (प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र अर्ज उपलब्ध केले जातील त्याप्रमाणे प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र फॉर्म फी आणि इसारा रक्कम घेण्यात येईल.) | १ |

- 'एल' विभागातील इच्छूक पात्र संस्थाना दि. ११.०६.२०२५ ते १८.०६.२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत 'एल' विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) खात्याकडून फॉर्म फी करीता रुपये ३,६३०/- + १८% जिएसटी इतक्या रक्कमेचे चलान देण्यात येईल.
- सदर चलनाचा भरणा नागरी सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर अर्जाचा नमुना आणि इसारा रक्कम रु. १०,२०००/- चे चलान देण्यात येईल. सदर चलनाचा भरणा 'बृहन्मुंबई महानगरपालिका' (BMC) या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी. व्दारे करणे आवश्यक आहे.
- विहित नमुना अर्ज आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन मोहोर बंद पाकीटात दि. १९.०६.२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत 'एल' विभागातील मुख्य लिपिक 'व्यय' खात्यात जमा करावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.
- प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र संस्थांची निवड यादी तयार करुन सदर यादीतुन सोडतीव्दारे संस्थेची निवड करण्यात येईल आणि यशस्वी झालेल्या संस्थेला कामाचे वाटप सहाय्यक आयुक्त 'एल' विभाग, योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.
- उपरोक्त नमुद कामासाठी संस्थेची निवड करण्याची प्रक्रीया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार सहाय्यक आयुक्त 'एल' विभाग यांचेकडे आहेत.

सही/-
सहाय्यक अभियंता
(परि.) "एल"/ पू. विभाग

सही/-
सहाय्यक अभियंता
(परि.) एल' / प विभाग

पीआरओ/६३२/जाहि./२०२५-२६

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण

### - जाहिर सूचना-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **पुर्व उपनगरातील** परिमंडळ - ५ मधील 'एम-प' विभागातील ०१ प्रस्ताव व परिमंडळ - ६ मधील 'एन' विभागातील ०१ प्रस्ताव अशा **एकूण ०२ प्रस्तावास** कलम ८ (६) अन्वये मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे | पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या https://portal.mcgm.gov.in/ संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. २८ (एम-प), २९ (एन)

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,**
**संत सावता माळी मार्ग,**
**भायखळा (पूर्व), मुंबई -४०००२७**
**दूरध्वनी क्र. २३७४२१६२**
**Email id- dysg.ta@mcgm.gov.in**

सही/-
उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी

पीआरओ/६२४/जाहि./२०२५-२६

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा



ANAND RATHI आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडः एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत

**ताबा सूचना**

सर्व संबंधित पक्षांची दखल घ्यावी, तर आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ (२००२ चा कायदा ५४) अंतर्गत आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ च्या कलम १३ उप–कलम २ अंतर्गत डिमांड नोटीस जारी केली (तपशील खालील तक्त्यामध्ये, यापुढे डिमांड नोटिस नंतर नमूद केले आहे) कर्जदाराला (तपशीलवार खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केले आहे, त्यानंतर कर्जदाराला) मागणी नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी पुढील आणि भविष्यातील व्याजासह करारानुसार व्याज दराने परतफेड करण्याचे आवाहन करणे डिमांड नोटिस मिळाल्यापासून ६0 दिवसांच्या आत एआरजीएफएल द्वारे देय आणि/किंवा वसूली होईपर्यंत, डिमांड नोटिसच्या तारखेपासून (असल्यास) देय असलेले खर्च आणि शुल्क आणि इतर पैसे (यापुढे देय रक्कम).

कर्जदार (ते) आणि सह–कर्जदार (ने) देय रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झाले आहेत, ही नोटीस येथे खाली नमूद केलेल्या कर्जदाराला विशेषतः दिली जाते आणि सर्वसाधारणपणे सार्वजनिकपणे की अधोस्वाक्षरीने त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेचा (डिमांड नोटिस अंतर्गत परिभाषित केल्यानुसार) प्रतिकात्मक ताबा घेतला आहे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ च्या कलम १३ च्या उप–कलम (४) अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या तारखेला खाली नमूद केले आहे.

पुढे कर्जदात्याने (एआरजीएफएल) २३.०४.२०२५ रोजी ठाणे, मुंबई येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात Cri.M.A./1911/2025 दाखल केला आहे. ठाणे, मुंबई येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात प्रत्यक्ष ताबा मिळविण्याचा आदेश देण्यात आला होता आणि त्या आदेशाच्या आधारे आम्ही १०.०६.२०२५ रोजी गहाण मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. (अनुसूची–१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे गहाण मालमत्ता).

त्यानंतर, एआरजीएफएलने, वरील हमीपत्राच्या पूर्ततेसाठी आणि ठाणे, मुंबई येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दिलेल्या वरील आदेशाचे पालन करून, सुरक्षित मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

कर्जदार आणि सह–कर्जदार (ने) विशेषतः आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेशी व्यवहार करू नका आणि मालमत्ता/सुरक्षित मालमत्तांशी कोणतेही व्यवहार आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या अधीन असतील थकबाकीच्या रकमेसाठी (विशेषतः खाली नमूद केलेले) पुढील आणि भविष्यातील व्याजासह त्यावरील करारानुसार व्याज दरासह खर्च आणि शुल्क आणि देय इतर पैसे (असल्यास) एआरजीएफएल द्वारे पेमेंट आणि/किंवा वसूली तारखेपर्यंत. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप–कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

कर्जदाराचे नाव पत्ता: मेसर्स डेअरी कॉर्नर, दुकान क्रमांक १५, शिव साई सोसायटी, पाचपाखडी, सरस्वती इंग्रजी माध्यमाजवळ, टेकडी बंगला, ठाणे पश्चिम, ठाणे: ४००६०२.

सह–कर्जदार(चे) नाव पत्ता: (१) श्री शैलेश मंडलिक (२) श्रीमती अनिता शैलेश मंडलिक फ्लॅट नं ३०१, पार्वती सीएचएसएल, तिसरा मजला, आम्रपाली हॉटेलच्या वर, गडकरी रंगायतन जवळ, तळोपाली, ठाणे पश्चिम: ४००६०१.

| | | |
|---|---|---|
| मागणी सूचनेनुसार देय रक्कम आणि लागू असलेले अतिरिक्त व्याज: रु.५२,४६,३४९/– (रुपये बावन्न लाख छैचाळीस हजार तीनशे एकोणपन्नास फक्त) | आरओआय | 13.00% |
| | प्राचार्य थकबाकीदार | 4,929,591 |
| | ईएमआय रक्कम प्रलंबित | 254,872 |
| | खंडित कालावधी व्याज | 3,560 |
| मागणी सूचनेची तारीख: १३ डिसेंबर २०२४. | थकीत व्याजापेक्षा जास्त | 21,726 |
| | कायदेशीर शुल्क | 26,500 |
| कर्ज करार क्रमांक: APPL00009502 | नोटीस शुल्क | 1,100 |
| | ईएमआय बाऊन्स चार्जेस | 9,000 |
| भौतिक ताबा मिळाल्याची तारीख: १० जून २०२५ | एकूण थकबाकी | 52,46,349 |

मालमत्तेची माहिती: फ्लॅट क्रमांक ३०१, तिसरा मजला, पार्वती सीएचएसएल, सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजजवळ, अहिल्यादेवी होळकर मार्ग, सीटीएस क्रमांक २२७, २२३अ, २२३, चरई गावातील टीका क्रमांक १३, ठाणे (पश्चिम), ठाणे: ४००६०१, महाराष्ट्र, भारत.

तारीख: १० जून २०२५
ठिकाण: मुंबई

स्वा/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
प्राधिकृत अधिकारी

# उन्माद आणि बेपर्वाई...

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाने पंजाब किंग्जला हरवून तब्बल १८ वर्षांनंतर आयपीएलचा चषक जिंकल्यावर सर्व देशात फटाके वाजले. मध्यरात्रीपर्यंत देशातील कोट्यवधी क्रिकेट प्रेमी टीव्हीच्या पडद्यावर प्रत्येक चेंडूनंतर काय होणार हे मोठ्या उत्सुकतेने पाहत होते.

अगदी शेवटच्या षटकापर्यंत ही उत्सुकता कायम होती. केवळ बंगळूरुच नव्हे तर महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, अहिल्यानगरमध्ये जल्लोष झाला. दिल्लीपासून गल्लीपर्यंत क्रिकेटप्रेमींनी विराटचा जयघोष केला. आदल्या रात्री विजय मिळवला व दुसऱ्याच दिवशी बंगळूरुमध्ये विजयी टीमच्या जंगी स्वागताचा सोहळा ठरविण्यात आला. बंगळूरुच्या विधानसौध ते चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंत विजयी मिरवणूक, विधानसौधमध्ये सत्कार आणि स्टेडियमवर हजारो लोकांच्या साक्षीने विजयी सोहळा असा कार्यक्रम ठरविण्यात आला.

मुळातच हा कार्यक्रम घाईघाईने ठरवला गेला. इतक्या कमी वेळात त्याचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था व विजयोत्सवाची तयारी शक्य होती काय? याचा रॉयल चॅलेंजर्स, कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन आणि राज्यात सत्तेवर असलेल्या सिद्धरामय्या सरकारनेही कोणताच गांभीर्याने विचार केला नसावा.

आपल्या राज्याचा संघ १८ वर्षांनी आयपीएल जिंकला, त्याच्या विजयाचे श्रेय आपणच घेतले पाहिजे, तेही झटपट आणि लगेचच असा विचार त्यांनी केला असावा. कारण या संघातील विराट कोहलीसह अन्य खेळाडूंना लगेचच कुठे ना कुठे बाहेर जायचे होते...

चिन्नास्वामी स्टेडियम हे बंगळूरुच्या अतिशय गजबजलेल्या भागात आहे. स्टेडियमची प्रेक्षकांची क्षमता पस्तीस हजार आहे. विराटची विजयी टीम तिथे येण्यापूर्वीच स्टेडियममध्ये साठ-सत्तर हजार लोक घुसले होते आणि स्टेडियमबाहेर किमान तीन ते साडेतीन लाखांची खचाखच गर्दी होती. तीन-चार लाख लोकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी तेथे केवळ चौदाशे पोलीस होते.

आपल्या विजयी टीमला बघण्यासाठी आलेल्या महाप्रचंड गर्दीला कोणालाही आवरणे शक्य झाले नाही. स्टेडियममध्ये क्षमतेपेक्षा दुप्पट लोक घुसल्यामुळे स्टेडियमचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते, त्याचा परिणाम दरवाजे तोडून लोकांनी आत घुसण्याचा प्रयत्न केला.

मग दुसरे काय होणार... तुफान चेंगराचेंगरी, तुडवातुडवी... त्यात अकरा जणांचा बळी गेला आणि पन्नासहून अधिक जखमी झाले. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाच्या विजयोत्सवाला गालबोट लागले. विजयोत्सवाचे शोकांतिकेत रूपांतर झाले...

भारताने पाकिस्तानवर हवाई व क्षेपणास्त्रांचे हल्ले करून एका रात्रीत दहशतवादी तळ नेस्तनाबूत केले, शंभर दहशतवादी यमसदनाला पाठवले. पाकिस्तानच्या हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले, शस्त्रसंधी झाल्यावर भाजपाने देशभर ऑपरेशन सिंदूर यात्रा काढल्या, विजयोत्सव साजरा केला पण कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.

युद्धातील विजयानंतर, निवडणुकीच्या निकालानंतर किंवा खेळातही चषक जिंकल्यानंतर देशात-विदेशातही विजयी मिरवणुका निघतात. विजयीवीरांना प्रत्यक्ष बघायला मिळावे म्हणून विजयोत्सव पाहण्यासाठी हजारो-लाखो लोक जमतात पण नियोजन नसेल किंवा गर्दीला उन्माद चढला असेल, तर त्याच विजयाला गालबोट लागते अशीही अनेक उदाहरणे आहेत.

याच वर्षी उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे कुंभमध्ये संगमात स्नान करण्यासाठी कोट्यवधी भाविक आले होते. पण २९ जानेवारी रोजी लाखोंच्या चेंगराचेंगरीत ४० जणांचा मृत्यू झाला व ६० जखमी झाले. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला व १५ जखमी झाले.

यातले बहुतेक प्रयागराजला जाणारे होते. दि. ३ मे २०२५ रोजी गोव्यात देवीच्या उत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला व १०० जखमी झाले. गर्दीवर नियंत्रण ठेवता न आल्याने या दुर्घटना घडल्या.

अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने १९७१ मध्ये वेस्ट इंडिजच्या विरोधात कसोटी मालिका प्रथमच जिंकली. भारतीय टीम मुंबईत आली तेव्हा तिच्या स्वागताला सांताक्रूझ विमानतळावर भल्या पहाटे हजारो लोक जमले होते. या टीमची खुल्या बसमधून मिरवणूक निघाली व रस्त्यावर दोन्ही बाजूंनी उभ्या असलेल्या हजारो मुंबईकरांनी आपल्या विजयीवीरांवर पुष्पवृष्टी केली.

कपिल देवच्या नेतृत्वाखाली १९८३ मध्ये भारतीय संघाने वन डे विश्वचषक जिंकला. तेव्हा भारतीय टीमची मुंबईत विजयी मिरवणूक निघाली होती. सन २००७ मध्ये महेंद्र सिंग धोनीच्या नेतृवाखाली भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला, त्यानंतरही मुंबई विमानतळावरून वानखेडे स्टेडियमपर्यंत विजयी मिरवणूक निघाली होती.

सन २०११ मध्ये टीम इंडियाने मुंबईतच विश्व चषक जिंकला तेव्हाही मुंबईत क्रिकेट प्रेमींनी मोठा उत्सव साजरा केला होता. सन २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकून मुंबईत परतल्यावर याच शहरात मोठी विजयी मिरवणूक निघाली होती.

या मिरवणुकीत तर चार-पाच लाख सहभागी झाले होते. मरिन डाइव्हवर एवढी गर्दी होती की नेहमी दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी टीम इंडियाला चार तास लागले. गर्दीत धक्काबुक्कीत काहींना किरकोळ दुखापत झाली किंवा काहींची श्वास कोंडला त्यांना त्वरित वैद्यकीय उपचार मिळाले. लाखोंच्या गर्दीतही एक रुग्णवाहिका जात असताना लोक वाट करून देत होते, असे व्हीडिओ व्हायरल झाले होते.

मुंबईत सुरळीतपणे पार पडले ते बंगळूरुला का जमले नाही? मुंबई पोलीस, मुंबई क्रिकेट असोसिएशन, राज्य सरकार, मुंबई महापालिका यांच्यात असलेला समन्वय हा महत्त्वाचा होता. मग बंगळूरुमधील अशा यंत्रणांमध्ये परस्पर सुसंवाद, समन्वय नव्हता की फाजिल आत्मविश्वास सरकार, पोलीस व प्रशासनाला नडला?

बंगळूरु पोलिसांनी चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगचेंगरीत अकरा जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी रॉयल चॅलेजर्स बंगळूरु, डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट प्रा. लि. आणि कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन यांच्या विरोधात गुन्हे नोंदवले आहेत. रॉयल चॅलेजर्सच्या चार व डीएनए इव्हेंट कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी तर बंगळूरुचे पोलीस कमिशनर बी. दयानंद व चार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक (इंटेलिजन्स) हेमंत निंबाळकर यांची तत्काळ बदली केली आहे. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव के. गोविंदराज यांना पदावरून मुक्त केले आहे.

बंगळूरु दुर्घटनेचा तपास सीआयडीकडे सोपवला असून न्यायालयीन चौकशीचे आदेश निघाले आहेत.

विराट कोहलीच्या टीमच्या विजयी मिरवणुकीला व स्टेडियममधील विजयोत्सवाला हजर राहण्यासाठी किती लोक येतील याचा अंदाज पोलिसांना बांधता आला नाही. चार लाख लोक जमले याची कुणी कल्पनाही केली नव्हती.

हे सर्व लोक, तरुण मुले, विद्यार्थी घरी किंवा ऑफिसमध्ये सांगून सवरून किंवा सुट्टी रजा घेऊन आले होते का? आपले कामधंदे सोडून ही लाखोंची गर्दी आपल्या हिरोंना बघायला जमते याचा दुसरा अर्थ काय? हे सर्व कामधंदे, नोकरी, नसलेले लोक होते का? बंगळूरु हे देशातील मोठे आयटी सीटी आहे.

कॉर्पोरेट कंपन्यांची तिथे मोठी गर्दी आहे. मग या शहराला किमान शिस्त, नियोजन, सुरक्षितता काहीच नाही का? आयपीएल चषक जिंकल्यावर बंगळूरुला घाईघाईने विजयोत्सव साजरा करण्याचा निर्णय कुणाचा? विजयी मिरवणूक व स्टेडियममध्ये विजयोत्सव कुणी ठरवला? पोलिसांकडे परवानगीसाठी अर्ज कुणी केला?

पोलिसांनी विजयोत्सवाला व मिरवणुकीला नकार दिला असताना त्यांच्यावर दबाव कोणी आणला? दि. ३ जून बुधवार ऐवजी ८ जून रविवारी विजयोत्सव साजरा करावा अशी सूचना पोलिसांनी केली असताना पुन्हा ३ जून (वर्किंग डे) चा हट्ट कोणाचा? स्टेडियमवर विजयोत्सवासाठी मोफत पास वेबसाईटवर मिळतील असे आवाहन कोणी केले?

स्टेडियमबाहेर तीन-चार लाख लोकांची अनियंत्रित गर्दी असताना विधानसौधमध्ये सत्कार समारंभ कसा चालू होता? पोलिसांची संख्या, रुग्ण वाहिका, औषधोपचार, वाहतूक नियंत्रण, ही सारी इव्हेंट मॅनेजमेंट कुठे होती? उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यामार्फत आरसीबीचे पदाधिकारी पोलिसांवर दबाव आणत होते हे खरे काय? विजयोत्सवासाठी वेळ अपुरा आहे, असे पोलीस सतत सांगत असताना त्यांची सूचना धुडकावण्याचे काम सरकारमधील कुणाचे?

निलंबित पोलीस कमिशनर यांनीच विधानसौधमध्ये कार्यक्रम घेऊन नये असे म्हटले होते, पण मुख्यमंत्री कार्यालयातून त्यांच्यावर दबाव आणला गेला हे खरे काय? श्रेय घेण्यासाठी अतिघाईने विजयोत्सव आयोजित करायचा व शोकांतिका घडल्यावर पोलीस व प्रशासनातील वरिष्ठांचा बळी द्यायचा असा हा प्रकार आहे.

आयपीएल हे निव्वळ क्रिकेट नसून हा बिझनेस आहे हे काही लपून राहिलेले नाही. सर्वाधिक पैसे व सर्वाधिक टीआरपी हाच उद्देश आहे. टीमचे मालक खेळाडूंना पैसे देऊन विकत घेतात आणि मैदानात चिअर्स गर्ल्सही पैसे घेऊनच नाचतात.

या सामन्यांचे प्रक्षेपण करताना टीव्ही चॅनेल्समधील टीआरपीची जीवघेणी स्पर्धा असते. टी- शर्टस, टोप्यांपासून ते व्यापारी जाहिरातींची कोट्यवधींची उलाढाल असते. आयपीए हा खेळ आहे अशी कागदोपत्री नोंद असल्याने त्याच्या उत्पन्नावर कोणताही सरकारी कर नाही. ताकदवान राजकारणी व बडेबडे उद्योगसमूह यांचा आयपीएलशी संबंध असल्याने बाहेर काय घडते, याविषयी त्यांना कोण जाब विचारणार? ■ ■

## साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी.

साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत.

साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली.

१९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे.

त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतक?यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

---------------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे. ९९२२५४६२९५**

■ ■ ■

# बिहार मधील राजकीय समीकरणे

बिहार मध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप यांच्या दृष्टीने या निवडणुका अतिशय महत्त्वाच्या असणार आहेत.

२०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राजदचा विजय थोडक्यात हुकला होता.त्या निवडणुकीत राजदला ७५ जागा मिळाल्या होत्या आणि राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला ११० जागा मिळाल्या होत्या.भाजपाला ७४ जागा मिळाल्या होत्या, तर भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला १२५ जागा मिळाल्या होत्या.

२४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत साध्या बहुमतासाठी १२२ जागांची गरज असताना, भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआने १२५ जागा जिंकून काठावरचे बहुमत मिळविले होते. राजदकरता ही निवडणूक अशासाठी महत्वाची आहे की, गेल्यावेळी सत्तेवर येण्याची थोडक्यात हुकलेली संधी यावेळी त्यांना साधायची आहे.तर भाजपा आजवर एकदाही स्वबळावर बिहार मध्ये सत्तेवर आलेली नाही, त्यामुळे स्वबळावर बहुमत मिळवण्याचा भाजपाचा प्रयत्न राहील.

नितीशकुमार गेली दोन दशके बिहारचे मुख्यमंत्री आहेत. कधी भाजपा बरोबर तर कधी राजद बरोबर समझोता करून त्यांनी आपली मुख्यमंत्री पदाची खुर्ची टिकवली आहे.आपली मुख्यमंत्री पदाची खुर्ची टिकवण्यासाठी त्यांना आजवर बऱ्याच कसरती कराव्या लागल्या आहेत. त्यामुळेच त्यांना बिहार मध्ये पलटूराम या नावाने संबोधले जाते. मात्र अलिकडे त्यांची प्रकृती ठीक नसते.त्यांचा विसरभोळेपणा वाढला आहे.असे असले तरी भाजपाला बिहार मध्ये, नितीशकुमार यांच्याशिवाय पर्याय नाही.

बिहारमध्ये नितीशकुमार अद्याप आपला प्रभाव राखून आहेत.विशेषतः अतिमागास जाती, मुस्लिम समाज आणि महिला यांच्यामध्ये ते अतिशय लोकप्रिय आहेत. त्यामुळेच कमीपणा घेऊन भाजपाने त्यांना मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर बसवले. खरे पाहता २०२० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला ७४ जागांवर विजय मिळाला होता,तर नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त जनता दलाला फक्त ४३ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे संख्या बळाच्या जोरावर भाजपाला मुख्यमंत्रीपद मिळायला हवे होते, परंतु राजकीय समीकरणे लक्षात घेऊन भाजपाने नितीशकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवले होते.

२०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला १९ टक्के तर संयुक्त जनता दलाला १५ टक्के मते मिळाली होती. लोकजनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान यांनी त्या निवडणुकीत स्वतंत्रपणे निवडणूक लढवल्याने त्याचा मोठा फटका संयुक्त जनता दलाला बसला होता. लोकजनशक्ती पक्षाने जवळ जवळ २५ जागांवर संयुक्त जनता दलाचे नुकसान घडवून आणले होते.

राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला बहुमताचा आकडा गाठता आला नाही, याचे कारण, महाआघाडीच्या जागा वाटपात कॉंग्रेसला, क्षमतेपेक्षा जास्त जागा सोडण्यात आल्या होत्या. जागा वाटपात कॉंग्रेसला ७० जागा सोडण्यात आल्या होत्या, त्यापैकी कॉंग्रेसला फक्त १९ जागा जिंकता आल्याने, महाआघाडीला मोठा फटका बसला होता.

जर कॉंग्रेसला कमी जागा सोडण्यात आल्या असत्या तर राजदला जास्त जागा लढवता आल्या असत्या आणि निवडणुकीतील राजदचा स्ट्राईक रेट लक्षात घेता, महाआघाडीला जास्त जागा मिळाल्या असत्या आणि कदाचित महाआघाडी सत्तेवरही आली असती.

या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत, नोकरीच्या शोधात बिहार मधून होणारे स्थलांतर, बेरोजगारी, महागाई, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था परिस्थिती इत्यादी मुद्दे विरोधी पक्षांकडून मांडण्यात येतील, तर रालोआ कडून ऑपरेशन सिंदूरचा मुद्दा प्रामुख्याने मांडला जाईल.त्याशिवाय राजद प्रणित महाआघाडी सत्तेवर आल्यास बिहारमध्ये पुन्हा जंगल राज येईल अशी भीती भाजपा प्रणित रालोआकडून मतदारांना दाखवण्यात येईल.

लालुप्रसाद यादव यांनी राजदची स्थापना केल्यानंतर, निवडणुकीत यश मिळवण्यासाठी त्यांनी आपले मुस्लिम - यादव समीकरण व्यवस्थितपणे वापरले.त्या जोडीला आता तेजस्वी यादव यांनी ओबीसी आणि दलीत समाजाला काही प्रमाणात आपल्याकडे वळवल्याने राजदची स्थिती मजबूत दिसत आहे.

मात्र महाआघाडीतील कॉंग्रेसच्या कामगिरीवर महाआघाडीच्या यशाचे समीकरण अवलंबून रहाणार आहे.१९९० च्या दशकात कॉंग्रेसने लालुप्रसाद यादव यांच्या पक्षाशी युती केल्यानंतर, बिहार मध्ये कॉंग्रेसच्या घसरगुंडीला सुरूवात झाली, ती अद्याप सुरूच आहे. लालुप्रसाद यादव जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागांवर कॉंग्रेसने समाधान मानल्याने बिहारमध्ये कॉंग्रेसची वाढ खुंटली.याखेपेस कदाचीत कॉंग्रेसला गेल्या खेपेच्या तुलनेत कमी जागांवर लढावे लागेल.

महाआघाडी आणि रालोआ यांच्याशिवाय आणखी एक फॅक्टर बिहार विधानसभा निवडणुकीत महत्वाचा असणार आहे, तो म्हणजे प्रशांत किशोर फॅक्टर. प्रशांत किशोर यांनी काही दिवसांपूर्वी जनसुराज पक्षाची स्थापना केली असून, त्यांच्या पक्षाला महिला, युवक आणि मुस्लिम समाजाकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांना विधानसभा निवडणुकीत फारसे यश मिळण्याची शक्यता नसली तरी ते महाआघाडी आणि रालोआ यांची गणीते बिघडवू शकतील.



अभय गोखले

■ ■ ■

## न्यायालयाने या बाबतीतही लक्ष घालावे!



सुधारित नियमावलीनुसार छोट्या आकाराच्या प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्ती बनवण्यावर, तसेच त्यांची व्यावसायिक विक्री करण्यावर कोणतीही बंदी नसून त्यांचे विसर्जन मात्र केवळ कृत्रिम तलावातच करावे लागेल, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.

त्यामुळे पीओपी मुर्त्या बनवणाऱ्या व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने यंदाच्या माघी गणेशोत्सवापासून पीओपीवरील बंदीचा निर्णय लागू केला होता. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकांनी या वर्षी पीओपीवर बंदी असल्याचे आदेश काढले होते.

त्याविरोधात मूर्तीकार संघटनेने मुंबईत बैठक घेऊन न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला होता. पीओपीवरील बंदी उठवतांना न्यायालयाने पीओपीच्या प्रत्येक मूर्तीच्या मागच्या बाजूला लाल रंगाची खूण असणे अनिवार्य आहे, अशी अट घातली आहे.

मुळात गणेश चतुर्थी हा पूर्वापार चालत आलेला धार्मिक सण आहे. या सणाशी अनेकांच्या आस्था जोडल्या गेल्या आहेत. गणेश चतुर्थीच्या दिवशी आपण घरी श्री गणेशाची केवळ मूर्ती आणत नसून त्यानिमित्ताने साक्षात गणरायच आपल्या घरी विराजमान झाले आहेत या भावाने गणेशभक्त घरी आणलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करतो, तिचे मनोभावे पूजन करतो, प्रतिदिन गोडाचा नैवेद्य अर्पण करतो.

गणपती आपल्या घरी येणार याची सिद्धता एक महिना आधीपासूनच सुरु असते.

गणरायाला आसनस्थ करण्यासाठी मखर कोणते बनवावे, त्याच्यासाठी दागिने कोणते आणावेत, वस्त्र, फुले कोणती आणावीत याची सिद्धता प्रत्येक जण अगदी मनापासून करत असतो. त्यामुळे हा सण आणि उत्सव प्रत्येक गणेश भक्ताच्या आस्थेशी जोडला गेलेला आहे. श्री गणेश मूर्ती घरी आणताना ती कशी आणावी, तिची प्राणप्रतिष्ठा कशी करावी, तिची नियमित पूजा कशी करावी, उत्तरपूजा करून विसर्जन कसे आणि कोठे करावे या सर्वांसंदर्भात धर्मशास्त्र काय सांगते या गोष्टीही विचारात घ्यायला हव्यात.

गणेश मूर्ती मातीची असावी कि पीओपीची, तिचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतात करावे कि कृत्रिम तलावांत या सर्वांसंदर्भात शास्त्र काय सांगते हेसुद्धा विचारात घ्यायला हवे.

धर्मशास्त्रानुसार प्राणप्रतिष्ठा करून मनोभावे पूजन केलेल्या गणेशमूर्तीमध्ये श्री गणेशाची पवित्रके सामावलेली असतात त्यामुळे तिचे विसर्जन वाहत्या पाण्यात करावे जेणेकरून ही पवित्रके सर्वदूर पसरतील.

मात्र न्यायालयाने पीओपी गणेशमूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे सक्तीचे केले आहे. शहरांसारख्या ठिकाणी मागील काही वर्षांपासून श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव बांधले जातात. या उपक्रमासाठी महापालिका साहाय्य करते. या उपक्रमात गेल्या काही वर्षांत अनेक ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे.

कृत्रिम हौदात विसर्जित केलेल्या मुर्त्यांचा वापर खाणी बुजवण्यासाठी आणि विटा तयार करण्यासाठी केला जात असल्याचेही लक्षात आले आहे. श्रद्धेने घरी आणलेल्या आणि मनोभावे पुजलेल्या श्री गणेश मूर्तींची अशा प्रकारे केली जाणारी विटंबना योग्य नाही. न्यायालयाने या बाबींकडेही लक्ष घालावे.

----------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

### वाचक लिहितात

## सैन्याचे खच्चीकरण करू नका!

पहलगाव आतंकी हमल्यानंतर भारताने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले, त्या अंतर्गत ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील आतंकी ठिकाने नष्ट केले, तसेच पाकिस्तानने केलेल्या ड्रोन हमल्यांना सुद्धा भारतीय सेनेने निष्काम केले,

यामध्ये पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, त्याचे व्हिडिओ सर्व वृत्तवाहिन्यांवरून प्रसारित झाले. पाकिस्तान अनेक दशकांपासून भारतामध्ये आतंकवादी पाठवून निष्पाप नागरिकांचे बळी घेत आहे, आतंकवादाचा भारतासह अन्य देशांना सुद्धा त्रास आहे, या पार्श्वभूमीवर भारताने आतंकवादाच्या विरोधात कठोर भूमिका घेतली, यापुढे आतंकवाद खपवून घेतल्या जाणार नाही, हे पाकसह जगाला दाखवून दिले.

आतंकवादाचा जगातून बिमोळ व्हावा, तसेच पाक पुरस्कृत आतंकवादाचा खरा चेहरा जगासमोर यावा, आतंकवाद विरोधी या लढाईत भारताला अन्य देशाचे समर्थन मिळावे, यासाठी विदेश नीतीच्या अंतर्गत भारताने सर्व दलीय प्रतिनिधी मंडळ पहिल्यांदाच विदेश दौऱ्यावर पाठवले, मात्र विरोधी पक्ष आपली राजकीय पोळी भाजण्यात व्यस्त आहे, पहलगाम हल्ल्याच्या प्रत्यूत्तरात भारताने केलेल्या कारवाईमध्ये भारताचे किती नुकसान झाले, याची माहिती घेण्यामध्ये विरोधकांना रस आहे, अशी माहिती विचारणे म्हणजे भारतीय लष्करावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय, यामुळे सैनिकांचे खच्चीकरण होऊ शकते, खरे तर भारतीय सैनिकांमुळे आज आपण शांत झोपू शकतो.

आज युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वांनी देशहितासाठी एकत्र येऊन सैन्याचे मनोबल वाढवण्याची आवश्यकता आहे, मात्र काही विरोधी पक्ष आपले राजकीय डावपेच खेळत आहे, अशा लोकांपासून जनतेने सावध राहावे, राजकीय पक्षांनी देशहितासाठी राजकारण जरूर करावे, मात्र सैनिकांचे खच्चीकरण होणार, असे गढूळ राजकारण करू नये, असे जनतेला वाटते, कारण भारतीय लष्कर प्रमुखांनी सुद्धा म्हटले आहे की, जेव्हा युद्ध होत असते, तेव्हा नुकसान दोन्ही देशांचे असते.

■ **दत्तात्रय फोकमारे**
**यवतमाळ. 7447797335**

## भक्तांची वारी आनंदित करण्यासाठी उपाययोजना असाव्यात!

वारी ही केवळ वारकऱ्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी श्रद्धेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वारकरी भक्त मंडळी पारंपरिक दिंडीच्या माध्यमातून निरपेक्षपणे पायी वारी करतात. धार्मिक श्रद्धा, शिस्तबद्धता आणि भक्तिभावाने पार पडणा?या या वारीत हजारो भाविक सहभागी होतात. हा आध्यात्मिक सोहळा अनुभवण्यासाठी वारीच्या मार्गावर अनेक श्रद्धाळू दर्शनाच्या प्रतीक्षेत असतात.

अशा वेळी अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी उद्भवते. काही भागांमध्ये वारकऱ्यांना नैसर्गिक बदल आणि इतर अडचणींना सामोरे जावे लागते. हे टाळण्यासाठी रस्त्यांवर पादचारी उड्डाणपूल (स्कायवॉक) उभारण्यात यावा, पालखी तळांवरील विद्युत रोहित्र संरक्षित करण्यात यावेत, तसेच शौचालयांसाठी पुरेशा पाण्याची व्यवस्था असावी. पिण्याचे शुद्ध पाणी, विद्युत सुविधा आणि निवाऱ्याची योग्य व्यवस्था या सर्व सुविधा पालखी सोहळ्याच्या मुक्काम काळात वारकऱ्यांना मिळाव्यात.

या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी लोणंद (जि. सातारा) येथील प्रशासनाला वरील सूचना सादर केल्या. मात्र या उपाययोजना केवळ लोणंदपुरत्याच मर्यादित न राहता संपूर्ण पालखी मार्गावर राबविल्या जाव्यात, ही सर्व विठ्ठल भक्तांची अपेक्षा आहे.

वरील उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास वारकऱ्यांचा वारी अनुभव अधिक आनंददायी आणि सुसज्ज होईल. वारकरी आपली साधना म्हणून कोणतीही तक्रार न करता सगळी परिस्थिती आनंदाने स्वीकारतात. मात्र, त्यांना सुविधा पुरविल्यास स्थानिक जनता आणि प्रशासनासाठीही ती एक साधनाच ठरेल.

■ **हृषीकेश हरदास**
**वर्धा.**



## फूड ॲलर्जी आहे की नाही कसे ओळखावे?

आपल्यापैकी अनेकांना धुळीची, धुराची, तसेच पदार्थांची ॲलर्जी होत असते. त्यात असे अनेकजण आहेत जे वेगवेगळे खाद्यपदार्थ खाण्याचे शौकीन आहेत. अशातच काही लोकांना प्रत्येक अन्नपदार्थ खायला आवडत नाही, कारण त्यांना विशिष्ट पदार्थांची ॲलर्जी असते. याला फूड ॲलर्जी म्हणतात.

अनेकांना हे माहित नसते आपण खालेल्या कोणत्या पदार्थांमुळे आपल्या ॲलर्जी होत असते. तर ॲलर्जीची लक्षणे सहसा खाल्ल्यानंतर काही मिनिटांपासून ते दोन तासांत दिसून येतात, परंतु लोकं त्याला आजार मानतात आणि त्यानुसार डॉक्टरांकडे जाऊन उपचार घेत असतात.

ॲलर्जी कोणत्याही वयात होऊ शकते. म्हणजे एखाद्या बाळा जन्मतः ॲलर्जी होते. अनेक प्रकरणांमध्ये, लोकांना वर्षानुवर्षे माहित नसते की त्यांना विशिष्ट प्रकारच्या अन्नाची ?लर्जी आहे. याला सायलेंट ॲलर्जी म्हणतात. कारण या सायलेंट ॲलर्जीमध्ये तुम्हाला लक्षणे खूप उशिरा दिसून येतात, परंतु जर काही खाल्ल्यानंतर तुम्हाला पोटात गॅस, अपचन, चेहऱ्यावर मुरुम यासारखी लक्षणे दिसली तर ही त्या अन्नाच्या ॲलर्जीची लक्षणे आहेत. हे लक्षात ठेऊन तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. त्यानुसार उपचार करावे.

जर काही खाल्ल्यानंतर काही तास-ांत त्वचेवर खाज सुटणे किंवा अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी, चेहरा, ओठ, जीभ किंवा घसा सूज येणे, पोटदुखी, उलट्या किंवा जुलाब, चक्कर येणे अशी लक्षणे दिसली तर ती अन्नाची ॲलर्जी असू शकते. ते ओळखण्यासाठी तुम्ही काही चाचण्या करू शकता.

यासाठी स्किन प्रिक टेस्ट केली जाते. यामध्ये तुम्हाल नेमक्या कोणत्या पदार्थाच्या सेवनाने ॲलर्जीची समस्या होत आहे हे समजण्यासाठी अन्नपदार्थाची थोडीशी मात्रा शरीराच्या कोणत्याही भागावर लावली जाते आणि त्वचेला हलकेच टोचले जाते.

जर तिथे सूज किंवा लालसरपणा असेल तर ते ॲलर्जीचे लक्षण असू शकते. याशिवाय, रक्त तपासणी केली जाते. यामध्ये, इम्युनोग्लोबुलिन ई (आयजीई) अँटीबॉडीचे प्रमाण मोजले जाते, जे ॲलर्जीची प्रतिक्रिया दर्शवते.

फुड ॲलर्जीवर उपचार घेण्यासाठी तुम्ही ॲलर्जिस्ट आणि आहारतज्ञ दोघांचाही सल्ला घ्यावा. हे डॉक्टर ॲलर्जी ओळखतील आणि समस्येनुसार तुमच्यासाठी आहार चार्ट देखील तयार करतील.

■ ■ ■

### अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वट पोर्णिमा महत्व

**कुटूंबांचा आधारस्तंभ**
**वट पोर्णिमा सण**
**एकमेकांशी एकनिष्ठ**
**राहण्याच्या संस्काराची**
**देतो आम्हा शिकवण..**

**भारतीय संस्कृतीत**
**नैतिकतेला अधिष्ठान**
**भोगवादी प्रवृत्तीला**
**नसते मुळी प्राधान्य..**

**विश्वास सामंजस्य**
**समर्पणाचे जिथे जुळते**
**सुख शांती समाधान**
**त्या कुटूंबात सदैव नांदते!**

# लाईफस्टाईल नवीन मोहिमेद्वारा तमन्ना भाटियास सहभागी करून सर्वात मोठ्या विक्रीची घोषणा

**नागपूर, १० जून :** लाईफस्टाईल, भारतातील आघाडीच्या फॅशन डेस्टिनेशनपैकी एक असलेला लाईफस्टाईल, त्यांचा अनेक दिवसांपासून प्रतीक्षा असणारा एंड ऑफ सीझन सेल (EOSS) सादर करत आहे, जे ग्राहकांना फॅशन-फॉरवर्ड उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवर ५०% पर्यंतची सूट देत आहे. याव्यतिरिक्त, एचडीएफसी क्रेडिट कार्ड धारकांसाठी एक विशेष ऑफर असून यात त्यांना त्वरित १०%* ची सूट मिळते. * अटी व शर्ती लागू.

या सीझनमध्ये आणखी उत्तेजनापूर्ण बनवत, लाईफस्टाईल ने या मोहिमेसाठी विशेषतः तमन्ना भाटियासोबत भागीदारी केली आहे. सहज नैसर्गिक आकर्षण व मोहक गुण संपूर्ण भारताला ओळखली जाणारी, तमन्ना नवीन मोहिमेत ग्लॅमर आणि तिची व्यक्तिमत्त्वाशी समरसता असलेली अद्वितीय मिश्रण घेऊन येते.

अग्रगण्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्समधील नवीनतम ट्रेंड आणि फॅशन पर्यायांच्या विस्तृत निवडीसह, हा लाईफस्टाईल सेल फॅशन बद्दल चोखंदळ असणाऱ्या ग्राहकांना अतुलनीय किंमतीत विस्तृत श्रेणीत वस्त्रांचा संग्रह देऊ करते.

या सीझनच्या संग्रहात, उन्हाळ्यासाठी ताज्या व सुसज्ज असलेल्या डिझाईन्स आणि अभिजात वस्तूंचा मिलाप केला आहे, जे प्रीमियम स्टाइल किंवा दैनंदिन फॅशन शोधणाऱ्या प्रत्येक खरेदीदारासाठी काहीतरी नक्कीच देऊ करते. ही विक्री आणखी समयोचित बनवणारी गोष्ट म्हणजे अधिक सहजपणे उपलब्ध असणारी अशी ही लाईफस्टाईल प्रीमियम व उच्च-फॅशन उत्पादने जी फॅशन जगात बदल घडवत आहेत आणि मूल्य व शैली एकत्र आणणारे स्थान निर्माण करत आहे.



इतकेच नाही तर, तमन्ना भाटियाचा नवीम जाहिरात चित्रपट हा लाईफस्टाईलच्या काही आवडत्या ब्रँड्सच्या रूपाचा एक चैतन्यशील, उच्च दर्जाचा शोकेस आहे. ही संकल्पना तिच्या वैविध्यपूर्ण प्रतिभेवर प्रकाश टाकते – मग तो एक आकर्षक काळ्या रंगाचा पोशाख असो किंवा सणासुदीची पारंपारिक वेशभूषा असो, तमन्ना सहजतेने प्रत्येक रूप सहजतेने अंगिकारते. हा चित्रपट सीझनचा उत्साह टिपतो, भविष्यातील फॅशनचे कल आणि तिचे अनन्य वैशिष्ट्यपूर्ण आकर्षण यांचा मिलाप करतो.

लाईफस्टाईल प्रवक्त्याचे वक्तव्य – आमची मोहीम लाईफस्टाईलच्या एंड ऑफ सीझन सेलद्वारे ग्राहकांना नवीनतम फॅशन ट्रेंडचा शोध घेण्यास आमंत्रित करते. स्टाइल आणि सुलभतेचा मिलाप घडवणाऱ्या संग्रहाद्वारे, तमन्ना मोहिम सजीव बनवते व प्रत्येकाला आपली वैयक्तिक अनोखी शैली आत्मविश्वासाने व्यक्त करण्यास प्रेरित करते. रितेश मिश्रा – अध्यक्ष – उप-सीईओ.

भारतीय अभिनेत्री तमन्ना भाटिया म्हणाली, माझा विश्वास आहे की फॅशन म्हणजे फक्त ट्रेंडच नाही तर तुम्ही कोण आहात हे व्यक्त करणे आहे. लाईफस्टाईलच्या सेलमध्ये मला आवडणार वैशिष्ट्ये म्हणजे ती प्रत्येकासाठी प्रीमियम, ऑन-ट्रेंड फॅशन सुलभ करते तसेच लोकांना आत्मविश्वासाने त्यांचे व्यक्तिमत्व स्वीकारण्यास सक्षम करते.

लाईफस्टाईलचा हा सेल ट्रेंडसेटरना ३०० हून अधिक टॉप ब्रँड्समधील नवीनतम फॅशन्स खरेदी करण्याची एक उत्तम संधी देते – ज्यात बीबा, ग्लोबल देसी, जॅक अँड जोन्स, इंडियन टेरेन, पार्क अव्हेन्यू, पेपे जीन्स, AND, मेलेंज, जिंजर, FORCA, CODE, प्यूमा, ॲडिडास, फॉसिल, अरमानी एक्सचेंज, मेबेलाइन, लॉरियाल आणि बरेच काही समाविष्ट आहेत.

ग्राहक या सीझनमध्ये आवश्यक असलेले कपडे, सौंदर्य प्रसाधने, घड्याळे, सुगंध, पादत्राणे, हँडबॅग्ज आणि ॲक्सेसरीज हे सर्व काही आकर्षक किमतीत निवडू शकतात.

# प्रीमियमायझेशन आणि टेक अपग्रेड्समुळे नागपूरमध्ये ॲमेझॉन इंडियाची तिच्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स श्रेणीमध्ये झाली वाढ

**नागपूर, १० जून :** नागपुरमधील ग्राहक प्रीमियम तंत्रज्ञानाला मोठ्या प्रमाणात पसंती दर्शवत आहेत, ज्यामुळे कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि अप्लायंसेस यांसाठी उच्च वाढीचा विभाग म्हणून हे शहर लवकरच ओळखले जाणार आहे. अत्याधुनिक स्मार्टफोन आणि स्मार्ट उपकरणांपासून ते इमर्सिव्ह मनोरंजन उत्पादने आणि मोठ्या घरगुती उपकरणांपर्यंत, खरेदीदार वैशिष्ट्यपूर्ण, उच्च-कार्यक्षमता असलेल्या उपायांची निवड वाढत्या प्रमाणात करत आहेत.

ॲमेझॉन इंडियाच्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्सच्या संचालक झेबा खान म्हणाल्या, भारत आता केवळ तंत्रज्ञानाचा अवलंबच करत नाही आहे, तर तो स्वतःच्या तत्वांवर – स्मार्ट, वेगवान, अधिक वैयक्तिक आणि महत्त्वाचे म्हणजे अधिक परवडणाऱ्या – तंत्रज्ञानाची मागणी करत आहे.



Amazon.in वर, आम्ही हे परिवर्तन प्रत्यक्ष पाहत आहोत, ग्राहक दैनंदिन जीवन सुधारणाऱ्या उत्पादनांकडे अपग्रेड करत आहेत. या बदलामुळे वाढती आशा आणि गुणवत्ता तसेच नवकल्पकता आणि कनेक्टिव्हिटी यांची भरपूर पसंती असल्याचे दिसून येते. विस्तृत निवड, उत्तम मूल्य आणि विश्वासार्ह सेवांद्वारे ग्राहकांना आत्मविश्वासाने खरेदी करण्यास मदत करणाऱ्या या उत्पादनांना उपलब्ध करून देणे यावर आमचा भर आहे.

नागपूर शहर संपूर्ण भारतात तंत्रज्ञानाच्या वापरासाठी एक गती निर्माण करत आहे. स्मार्टफोन विक्रीत दुहेरी अंकी वाढ झाली आहे, या विभागात १.६ पट वाढ झाली आहे आणि ३०,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीची विक्री झाली आहे. नागपूरमध्ये मोठ्या उपकरणांच्या विक्रीत १.५ पट वाढ झाली आहे, ज्यामध्ये ग्राहकांची प्रीमियम कूलिंग आणि स्टोरेज सोल्यूशन यांना पसंती असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. २-टन एसी, डबल-डोअर रेफ्रिजरेटर आणि उच्च-क्षमतेच्या वॉशिंग मशीनच्या मागणीमुळे रेफ्रिजरेटरची १.६५ पट वाढ नोंदवली गेली आणि एअर कंडिशनर्सची १.४ पट वाढ नोंदवली गेली.

# आयुश आर्ट अँड बुलियनची महसूल व नफ्यामध्ये लक्षणिय वाढ

## १.८१ कोटी रुपयांचा कंपनीला निव्वळ नफा

**नागपूर, १० जून :** आयुश आर्ट अँड बुलियन लि. ही पूर्वीची एकेएम क्रिएशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या २०२५ च्या अर्ध वार्षिक आणि २०२५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणाचे एकत्रित वित्तीय निकाल घोषित केले आहेत. कंपनीने महसूल आणि नफ्यामध्ये लक्षणिय वाढ नोंदवली आहे. हे कंपनीचे शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापन आणि वाढीकडे लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोन प्रतिबिंबित करते.

दरम्यान, ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीने कामकाजामधून ७३.७७ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला असून २०२४ मध्ये ७.३३ कोटी रुपयांच्या नोंदवलेल्या रकमेच्या तुलनेत प्रती वर्ष १० पट वाढ आहे. तर कंपनीला २०२४ या वर्षाच्या २६ लाख रुपयांच्या निव्वळ नफ्याच्या तुलनेत १.८१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. म्हणजेच प्रती वर्ष जवळपास ७०० टक्क्यांची वाढ आहे. वित्तीय वर्ष २४ मधील ०.२१ रुपयांच्या तुलनेत प्रति शेअर (ईपीएस) १.८१ रुपयांची कमाई नोंदविली गेली. गेल्या वर्षात विक्री सीएजीआरने १०४ आणि ६२ टक्केच्या निव्वळ नफ्यात गेल्या पाच वर्षात मजबूत वाढीसह कंपनी कर्जमुक्त झाली आहे. मार्च २०२५ पर्यंतच्या प्रमोटर ग्रुपचे प्रमाण २०.७१% (३१.७० लाख शेअर्स) आहे.

आयुश आर्ट अँड बुलियन लि. या कंपनीच्या व्यवस्थापनाने म्हटले आहे की, आर्थिक वर्ष म्हणजे आयुश आर्ट आणि बुलियन लि.साठी एक परिवर्तनात्मक वर्ष आहे, मजबूत महसूल वाढ आणि नफ्यात महत्त्वपूर्ण सुधारणा झाली आहे. ही कामगिरी आमच्या सामरिक उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीचा, आमच्या समर्पित कार्यसंघाच्या दीर्घकालीनतेची अंमलबजावणी करीत आहे. आमच्या भागधारकांसाठी वाढ आणि नाविन्याचा प्रवास सुरू ठेवत आहे.

३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या अर्ध्या वर्षासाठी (१ ऑक्टोबर, २०२४- १ मार्च, २०२५) कंपनीने एकूण उत्पन्न ४७.१९ कोटी रुपये नोंदवले. तर २०२५ (एप्रिल १, २०२४-सप्टेंबर २०२४) मध्ये २६.५८ कोटी रुपये होते. ही वाढ प्रती वर्ष ७७ टक्के होती. २०२५ या दोन अर्ध वार्षिक वर्षातील निव्वळ नफा १.५६ कोटी रुपये नोंदवला गेला. हाच नफा २०२५ च्या पहिल्या अर्ध वर्षात २४लाख रुपये होता. ईपीएस २०२५ साठी अर्ध वर्षात ०.१७ च्या तुलनेत २०२५ च्या दोन अर्ध वार्षिक वर्षात ईपीएस १.०२ रुपये नोंदवला गेला आहे.

आयुश आर्ट अँड बुलियन लि.ची २००९ मध्ये स्थापना झाली. ज्याला पूर्वी एकेएम क्रिएशन्स लि. म्हणून ओळखले जाते, ही बुलियन ट्रेडिंग अँड आर्ट विभागांमध्ये कार्यरत सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे. स्थिर, वाढ-केंद्रित भविष्य तयार करण्यासाठी कंपनी आपल्या नवीन व्यवसायाच्या दिशेने फायदा घेत आहे.

# पॉलिसीबझारसोबत भागीदारी करून एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर

**नागपूर, १० जून :** स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाईफ) ने पॉलिसीबझारसोबत भागीदारी करून एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर केला आहे. हा एक नवीन, उच्च-संभाव्यता संपन्न इक्विटी फंड असून तो त्यांच्या युलिप पेन्शन प्रॉडक्ट एसयूडी लाइफ पेन्शन प्लस साठी डिझाइन करण्यात आला आहे. हा नाविन्यपूर्ण फंड ग्राहकांना दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी एक धोरणात्मक मार्ग देऊन सक्षम करण्यासाठी सज्ज आहे, ज्याचा उद्देश त्यांच्या निवृत्ती बचतीला लक्षणीयरीत्या बळकटी देणे आणि अधिक लवचिक आर्थिक भविष्य घडविण्यास मदत करणारे उत्कृष्ट परतावे देणे आहे.

एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड, टॉप ३०० कंपन्यांमधून निवडलेल्या ५० उच्च-प्रदर्शन करणाऱ्या स्टॉक्समध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन संपत्ती निर्मितीवर केंद्रित दृष्टिकोन करतो. हा फंड वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, भांडवली वस्तू आणि पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, तंत्रज्ञान, तेल, धातू व खाणकाम, ऑटोमोबाईल्स व त्यांच्या सहाय्यक वस्तू आणि बांधकाम व रिअल्टी यांसारख्या महत्त्वाच्या आणि जलद वाढणाऱ्या क्षेत्रांमध्ये रणनीतीनुसार विविधता आणतो. बाजारातील सतत बदलणाऱ्या संधींशी सुसंगत राहण्यासाठी, या फंडाचा पोर्टफोलिओ प्रत्येक तिमाहीत धोरणात्मक पद्धतीने नव्याने समायोजित केला जातो, जेणेकरून त्याची उपयुक्तता आणि कामगिरी कायम राहते.



लाँचविषयी बोलताना स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अभय तिवारी म्हणाले, एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंडद्वारे आम्ही आमच्या ग्राहकांसाठी एक रणनीतिक मालमत्ता सादर करत आहोत. दीर्घकालीन निवृत्ती नियोजनासाठी खास डिझाइन केलेल्या उच्च-कार्यक्षमता गुंतवणूक पर्यायांची आम्ही वचनबद्धतेने आखणी करतो, आणि हा फंड त्याचाच स्पष्ट प्रतिबिंब आहे. आम्हाला विश्वास आहे की हा फंड आमच्या ग्राहकांना त्यांच्या आर्थिक भविष्याला अधिक मजबूत करण्यासाठी एक प्रभावी साधन ठरेल.

पॉलिसीबझारचे लाइफ इन्शुरन्स विभागाचे चीफ बिझनेस ऑफिसर विवेक जैन म्हणाले, भारतात निवृत्ती नियोजन हे अनेकदा सावध बचती आणि बाजार-संलग्न वाढीच्या अपेक्षांमधील संतुलन म्हणून पाहिले जाते. बदलत्या आकांक्षा आणि आर्थिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, आता अधिक स्मार्ट आणि गतिशील उपाययोजनांची गरज वाढत आहे. ही गरज ओळखूनच, पॉलिसीबझारने एसयूडी लाइफसोबत भागीदारी करत एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर केला आहे हा त्यांच्या युलीप पेन्शन प्रॉडक्ट 'एसयूडी लाइफ पेन्शन प्लस' साठी डिझाइन केलेला उच्च संभाव्यता असलेला इक्विटी फंड आहे. हा भारताच्या उच्च-वाढीच्या क्षेत्रांचा लाभ घेण्यासाठी डिझाइन केलेला आणि दीर्घकालीन स्थिरतेला प्राधान्य देणारा आपल्या प्रकारातील पहिलाच इक्विटी फंड आहे. आम्ही ग्राहकांना असा निवृत्ती निधी उभारण्यासाठी सक्षम करत आहोत, जो केवळ सुरक्षितच नसेल तर भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेशी सुसंगत देखील असेल.

# आकर्षक किंमत आणि सुबक डिझाईन्ससह पीएनजी ज्वेलर्स सादर करीत आहेत नवा हिरेजडित हार

**नागपूर, १० जून :** महाराष्ट्रातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्स यांनी त्यांच्या नवीन डायमंड ज्वेलरी मोहिमेअंतर्गत एक अत्याधुनिक आणि सौंदर्यपूर्ण नैसर्गिक हिरेजडित हार सादर केला आहे. या हाराची किंमत फक्त रुपये २,२५,०००/- असून त्यामध्ये आधुनिकतेची झलक आणि कलात्मक कारागिरीचा उत्तम मिलाप असून कुशल कारागिरांच्या कारागिरीतून हा हार साकार झाला आहेत.



पिवळ्या आणि गुलाबी सोन्यात उपलब्ध असलेला हा हार फुलांच्या प्रेरणेतून तयार झालेला असून त्यात पारंपरिक सौंदर्य आणि आधुनिक डिझाइन यांचे सुंदर मिश्रण आढळते. कमी सोन्याचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या डिझाइनमुळे हाराचे वजन हलके असून त्यात वापरलेले हिरे अधिक उठून दिसतात, जे प्रत्येक प्रसंगासाठी योग्य आणि स्टायलिश पर्याय ठरतात.


नैसर्गिक हिऱ्यांची मूळची चमक यात जपली गेली असून त्याला सुसंगत खास अशी या दागिन्यांची रचना करण्यात आली आहे, जी प्रत्येक प्रसंगासाठी तसेच कार्यालयीन वापरासाठी, प्रियजनांना भेट देण्यासाठी उपयोगी ठरेल. तसेच आपल्या वैयक्तिक दागिन्यांच्या संग्रहातही यामुळे अनोखी भर पडेल.

ग्राहकांच्या मागणीनुसार पीएनजी ज्वेलर्सने परवडणाऱ्या किंमतीत हिरेजडित दागिन्यांची ही नवी श्रेणी पुन्हा सादर केली आहे, याद्वारे स्टाईल आणि दर्जामध्ये कोणतीही तडजोड न करता ग्राहकांना निवड करणे सोयीचे होईल.ही खास ऑफर २ जून ते ३० जून २०२५ दरम्यान पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे.

# पडद्यावरील पित्याचा प्रत्यक्षात पितृत्वाचा अनुभव: सोनी सबवरील कलाकार फादर्स डेच्या निमित्ताने साजरे करत आहेत पितृत्व

**मुंबई, १० जून :** फादर्स डे चे औचित्य साधून सोनी सबवरील कलाकार पितृत्वाविषयी त्यांचे व्यक्तिगत अनुभव आणि विचार शेअर करत आहेत- पित्याची भूमिका जितकी सार्थकता देणारी असते, तितकीच आव्हानात्मक देखील असते. अभिनेता जयेश मोरे, सुमित राघवन, आरव चौधरी आणि जयेश भारभाया सांगत आहेत पितृत्वासोबत त्यांना मिळालेला आनंद, जबाबदाऱ्या आणि धडा! त्यांच्या मुलांशी असलेले त्यांचे नाते कसे खास आहे, त्यांच्यात कोणती मूल्ये रुजवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो आणि पितृत्वामुळे पडद्यावर आणि पडद्याच्या मागे त्यांचा दृष्टिकोन कसा बदलला याविषयी हे कलाकार मोकळेपणाने बोलत आहेत.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, मी जर कामात नसेन, तर फादर्स डे मी घरी माझ्या मुलांसोबत साजरा करतो. मला वाटते की मी एक सक्रिय पिता आहे- घरी आणि पडद्यावरील माझ्या सखी आणि अथर्व या मुलांसाठी देखील. माझ्या आयुष्यात माझ्या वडिलांशी माझे घट्ट नाते आहे. माझ्यासाठी ते माझे सुपरहीरो आहेत. मला माहीत आहे, असे सांगणारा मी काही पहिला मुलगा नाही! पण ते खरोखर एक नायक आहेत, ज्यांनी माझे व्यक्तिमत्व घडवले आहे. माझ्या चाहत्यांना मी हेच सांगेन की, आपल्या माता-पित्याचा नेहमी आदर करा कारण ते आपले गुरु असतात. आपण त्यांना प्रेम दिले पाहिजे आणि त्यांची प्रेमाने काळजी घेतली पाहिजे.




वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करणारा आरव चौधरी म्हणतो, माझ्या मते, पितृत्व ही पुरुषाला मिळालेली सर्वात दमदार आणि विनम्र करणारी भूमिका आहे. पितृत्व म्हणजे केवळ संरक्षण आणि पोषण नाही, तर सचोटी, संयम आणि सहानुभूतीने एखादे आयुष्य घडवणे. मला वाटते पित्याने स्वतःचे उदाहरण देऊन मुलाला मार्गदर्शन करायचे असते. आपल्या कृतीमधून धैर्य दाखवून द्यायचे असते. आणि हे देखील शिकवायचे असते की, खरी ताकद ही दया आणि मूक लवचिकतेत असते. आपली मूल्ये आणि निवडी यामधून आपण जो वारसा पुढे नेतो, तोच आपल्या मुलांमध्ये रुजतो. हनुमानाचा पिता केसरीची भूमिका करताना मी अभिमान अनुभवतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत बापोद्राची भूमिका करणारा जयेश भारभाया म्हणतो, बापोद्रा म्हणून मी जरा भडक आणि हेकट असलो तरी माझी मुलगी प्रार्थना हिच्या बाबतीत मात्र माझ्यातला हळुवारपणा दिसून येतो. पडद्यावरच्या आमच्या नात्यात प्रेम, काळजी आणि एक मूक समजूतदारपणा आहे. हे खास होण्याचे कारण म्हणजे पडद्याच्या मागे देखील आमचे नाते असेच आहे. शूटिंग करताना आमच्यात एक आपलेपणा आणि मोकळेपणा असतो. मला ती खरोखर माझी मुलगी असल्यासारखीच वाटते. या फादर्स डे च्या निमित्ताने मी माझी ही भावना व्यक्त करू इच्छितो की मला या गोष्टीचा आनंद वाटतो की, मला या मालिकेत अशा एका पित्याची भूमिका करण्याची संधी मिळाली आहे, ज्याच्यात वेगवेगळे स्तर आहेत. त्याचा एक भावनिक प्रवास आहे आणि पडद्यावर आणि पडद्याच्या मागे देखील मला पितृत्व अनुभवण्याची संधी ही भूमिका देते.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दिलीप पटेलची भूमिका करणारा जयेश मोरे म्हणतो, या मालिकेत सुरुवातीला माझी व्यक्तिरेखा चांगल्या पित्याची नव्हती. पण जेव्हा त्याला आपली मुले अश्विन, चिराग आणि दीप्ती यांना आधार देण्याचे महत्त्व उमगले, त्यानंतर त्याच्या स्वभावात परिवर्तन आले. सुरुवातीला दिलीपमध्ये नकारात्मक छटा होत्या पण आज तो त्याच्या कुटुंबाचा खंबीर आधार बनला आहे. या फादर्स डे च्या निमित्ताने, मला दिलीपचा सगळा प्रवास आठवला. पडद्याच्या मागे देखील या सगळ्या कलाकारांशी माझे छान नाते आहे. खास करून देशना, जी माझी सगळ्यात धाकटी मुलगी आहे, तिच्याशी माझे अधिक घट्ट नाते आहे. बऱ्याचदा ती परीक्षेच्या वेळी देखील माझे मार्गदर्शन घेते. खरोखर या सेटवर मी दुसरे कुटुंब मिळवले आहे, असे मला वाटते.

# शब्दकोडे क्रमांक २१३४



आडवे शब्द :-
१) मर्कट
३) व्यायाम
६) नावात केलेला बदल
११) मागणी, विनंती
१२) तालु क्याचे वसुलीचे काम
१४) विधानसभा, लोकसभा येथील लोकप्रतिनिधी
१८) रात्र
१९) वडाचे झाड
२०) पगार
२१) छोटी विश्रांती
२३) शपथ
२४) पटल
२६) घरोघर
२८) वर-वधुची मिरवणूक
३०) सूर्य
३२) उंट हाकणारा
३४) दीपोत्सव
३६) सौंदर्य
३८) गढूळ (प्रा. म.)
४०) पायाच्या तळव्याचा एक भाग
४१) नवरा मुलगा
४३) एक प्रकारचे लोकरीचे कापड
४५) वर्ण
४७) प्रेत
४९) किराणा व्यापारी
५०) खरडून काढलेला भाग
५१) आप्तजन
५३) वाळा
५४) मोठा हातोडा
५५) चरबी
५७) चमक, मुरगळा
६०) चक्कर, मूर्च्छा, भोवळ
६१) आल्याच्या रसाची वडी
६३) पाप
६४) परतफेड
६६) भला, छान
६७) सैन्याला मालपुरवठा
६९) सुसर
७०) गोव्याची राजधानी
७२) सत्ता, अधिकार, कैफ
७३) पवित्र
७४) कारस्थान
७६) जन्मदाता
७८) पुष्पगुच्छ
७९) कळलाव्या मुनी
८०) कर्णेंद्रिय
८१) धातूची तार काढणारा
८२) शंभर
८३) रक्षण करणारा

उभे शब्द :-
२) लेखणी
४) प्राणी आणि विदुषक यांचा खेळ
५) सिद्ध
६) विविध
७) लोकनाट्य
८) दारूचा एक प्रकार
९) कडक व चिवट
१०) हिंदुस्थान
१३) त्वरित
१४) संगीतातील तान
१५) वैरी, खटला दाखल करणारा
१६) घराणे, कुल
१७) वडिलांचे आई-वडील (हिं )
१८) आश्रय, थारा
२२) छाया
२५) होळीच्या सणातील हडळीचे सोंग
२७) धपाटा, चापट
२९) मोठा डेरेदार वृक्ष
३१) आर्जव, विनंती
३३) चावट
३५) धाक, जरब
३७) पंख
३८) अफूचे बी
३९) अव्याहत, सतत
४१) देवाशी केलेला करार
४२) देवघेव
४४) लाडात वाढलेला
४६) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
४८) लेख लिहिणारा
५२) चुकीचे(हिं )
५६) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५८) छोटी लढाई
५९) चानी
६१) झुकझुकगाडी
६२) मनोरंजन
६३) पाय, चरण
६४) घागरा
६५) संतापी
६८) मनाला टोचणारे दु:ख
७१) आयुष्य
७३) पळस
७५) पालव
७६) बारा महिन्याचा काळ
७७) वेल
७९) श्वसनेंद्रिय
८०) कावळा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# युरेका फोर्बज् तर्फे स्वच्छ, आरोग्यदायी भारतासाठी श्रद्धा कपूरची ब्रँड ॲम्बेसडर म्हणून नियुक्ती

**नागपूर, १० जून :** आरोग्य आणि स्वच्छता उद्योगातील भारतातील आघाडीची कंपनी युरेका फोर्बज लिमिटेडने त्यांच्या प्रतिष्ठेच्या व्हॅक्युम क्लिनर्सच्या श्रेणीसाठी अभिनेत्री श्रद्धा कपूरला ब्रँड ॲम्बेसडर म्हणून घोषित केले आहे. चार दशकांहून अधिक काळ लाखो भारतीय घरांमध्ये विश्वासार्हतेने सेवा देणाऱ्या या कॅटेगरी लीडरच्या या सहयोगामुळे युरेका फोर्बज्च्या स्वच्छता आणि आरोग्यदायी जीवनशैलीसाठी घेतलेल्या वचनबद्धतेत महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे.




व्हॅक्युम क्लिनिंगच्या क्षेत्रात बाजारपेठेतील अग्रणी आणि चार दशकांहून अधिक काळ जपलेल्या परंपरेसह युरेका फोर्बज्ने भारतीय घरांमध्ये नेहमीच अत्याधुनिक गृह स्वच्छता तंत्रज्ञान आणले असून त्याला अतुलनीय सर्व्हिस नेटवर्कचा आधार आहे. नवीन फोर्बज ज्स्मार्ट क्लिन रोबोटिक व्हॅक्युम क्लिनर्स शक्तिशाली सक्शन आणि वेट मॉपिंग यांचे एकत्रीकरण करून सहजतेने फरशी चकाचक करतात. AI आणि नेक्स्ट-जेन LiDAR तंत्रज्ञानाद्वारेही स्मार्टउपकरणे अचूकता, बुद्धिमत्ता आणि अतुलनीय सुविधा पुरवितात. श्रद्धा कपूरसोबत भागीदारी करताना युरेका फोर्बज्चे उद्दिष्ट आजच्या तरुण, शहरी ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे आहे. ते स्मार्ट आणि आरोग्यदायी जीवन शैलीला महत्त्व देतात. या भागीदारीद्वारे युरेका फोर्बज घरांना स्वच्छ आणि आरोग्यदायी उपाय सुविधांनी सक्षम करणे हे आपले ध्येय अधिक बळकट करत आहे.



## आज का अंदाज

बुधवार ११ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ६७९ | १६८ | १७८ | २३४ | १६६ | २६६ | १७७ | ११६ |
| ११० | २३० | ३५८ | ४५० | २२९ | ६९९ | ७८० | ४७७ |
| २०० | ३४८ | २७७ | ३६० | ३०० | ११२ | ३३९ | ५६७ |
| २४ | ५४ | ६३ | ९१ | ३२ | ४२ | ५७ | ८१ |
| २७ | ५७ | ६४ | ९३ | ३६ | ४६ | ५९ | ८७ |
| २० | ५० | ६८ | ९८ | ३० | ४० | ५१ | ८९ |

११ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४६ | ७६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस पुन्हा एकदा लक्ष केंद्रित करण्यासाठी आहे. तुमच्यासाठी सर्वात महत्त्वाचे काय आहे, याची यादी करा आणि त्यावर काम करा. यामुळे तुम्हाला योग्य दिशा मिळेल.

**वृषभ :** आज मकर राशीच्या व्यक्तींनी भूतकाळात झालेल्या गोष्टींवर विचार करण्याऐवजी भविष्यात तुमच्यासाठी काय संधी आहेत, यावर लक्ष केंद्रित करा. कामाचा ताण आणि चिंता करणे टाळा.

**मिथुन :** शांतता आणि संयमाने वागल्यास अनेक समस्या आपोआप सुटतील. तूळ राशीच्या व्यक्तींनी आज आपण ठरवलेल्या सर्व गोष्टी वेळेवर पूर्ण होत नाहीत. त्यामुळे निराश होऊ नका.

**कर्क :** आज एखाद्या कामात अपयश किंवा अनपेक्षित अडथळा येऊ शकतो, पण त्यामुळे खचून जाऊ नका. लक्षात ठेवा, जेव्हा एक दरवाजा बंद होतो, तेव्हा दुसरा नक्कीच उघडतो.

**सिंह :** सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास येणाजया प्रत्येक संधीचे सोने कराल. तुमच्या आयुष्यात येणाजया चांगल्या गोष्टींसाठी आणि नवीन संधींसाठी कायमच तयार राहा. तुमची दिनचर्या शिस्तबद्ध ठेवा.

**कन्या :** आज तुमची नेतृत्व करण्याची क्षमता दिसून येईल. दैनंदिन धावपळीतून थोडा वेळ काढून तुमच्या दीर्घकालीन ध्येयांचा विचार करा. तुम्ही योग्य मार्गावर आहात की नाही, हे तपासा.

**तुळ :** प्रत्येकमजण आपल्या अपेक्षेप्रमाणे वागेलच असे नाही, ही गोष्ट स्वीकारल्यास नात्यांमधील तणाव कमी होईल. सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास दिवस आनंदात जाईल.

**वृश्चिक :** जीवनातील या नैसर्गिक प्रक्रियेवर विश्वास ठेवा. लवकरच एक नवी आणि चांगली संधी तुम्हाला मिळणार आहे, त्यासाठी तयार रहा. आजचा दिवस प्रेम, आपुलकी आणि ऊर्जेने भरलेला असेल.

**धनु :** आजचा दिवस आत्मचिंतनासाठी उत्तम आहे. तुमच्यासाठी यश म्हणजे नक्की काय, याचा शांतपणे विचार करा. तुम्ही ज्या ध्येयांच्या मागे धावत आहात, त्यामुळे तुम्हाला आनंद आणि समाधान मिळेल.

**मकर :** आज तुम्ही इतरांना बदलण्याचा प्रयत्न करण्याऐवजी परिस्थिती जशी आहे तशी स्वीकारा. यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. गोष्टी समजून घेण्याची तुमची क्षमता वाढेल.

**कुंभ :** तुमच्या आजूबाजूला अनेक चांगल्या गोष्टी घडत आहेत, त्याकडे लक्ष द्या आणि सकारात्मक राहा. बदलाची प्रक्रिया कधीकधी तणावपूर्ण असू शकते, पण हे तात्पुरते आहे हे लक्षात ठेवा.

**मीन :** जेव्हा तुमचे ध्येय तुमच्या खजया गरजांशी जुळलेले असते, तेव्हाच तुम्हाला यशाचा खरा आनंद मिळतो. तुमच्या मनात जोडीदाराच्या प्रेमाबद्दल काही शंका असेल, तर ती आज दूर होईल.

महासागर



# सक्रियपणे खड्डे शोधावेत आणि भरावेत- महानगरपालिका आयुक्त

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

महापालिकेने रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी परिमंडळांनुसार निविदा आमंत्रित करून कंत्राटदार नियुक्त केले आहेत. त्याच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झाली आहे. सर्व २२७ निवडणूक प्रभागातील नियुक्त दुय्यम अभियंत्यांनी नेमून दिलेल्या क्षेत्रात दररोज दौरा करावा. स्वयंप्रेरणेने, अधिक सक्रियपणे (Proactively) खड्डे शोधावेत. खड्डे छोट्या आकारांचे असतानाच ते भरावेत, असे स्पष्ट निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी दिले आहेत. मुंबईकर नागरिकांना रस्ते प्रवासादरम्यान कोणत्याही गैरसोयींना सामोरे जावे लागू नये म्हणून खड्डेमुक्त रस्त्यांचे उद्दिष्ट ठेवून कार्यवाही करावी. रस्त्याची चाळण झाल्याचे निदर्शनास आल्यास कडक कारवाई केली जाईल, असा सक्त इशारादेखील श्री. गगराणी यांनी दिला आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी रस्ते व वाहतूक विभागाच्या अभियंत्यांची आज (दिनांक ९ जून २०२५) बैठक घेतली, त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर, उपायुक्त (पायाभूत सुविधा) श्री. शशांक भोरे, प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) श्री. गिरीश निकम यांच्यासह उपप्रमुख अभियंता, कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता आदी उपस्थित होते.



महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी म्हणाले की, जोरदार व सततच्या पावसाने रस्त्यांवर होणारे खड्डे भरण्याकामी कंत्राटदार नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. संबंधित कंत्राटदारांकडून रस्त्यावरील खड्डे तातडीने भरले जातील, यासाठी दुय्यम अभियंत्यांनी सजग राहिले पाहिजे. रस्त्यावरील खड्ड्यांची समस्या निकाली काढण्यासाठी / खड्डे मुक्त रस्ते असावेत यासाठी, मुंबई महानगरातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे प्रतिवर्षी खड्ड्यांची संख्या आणि समस्या हळूहळू कमी होत आहे. भविष्यात अधिकाधिक रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण होऊन खड्ड्यांची समस्या निश्चितच कमी होणार आहे. सन २०२३, २०२४ आणि २०२५ या तीनही वर्षांमध्ये प्रतिवर्ष खड्डे भरण्याकामी केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. नागरिकांची विशेषतः वाहनधारकांची गैरसोय होऊ नये म्हणून रस्ते विभागाचा संपूर्ण चमू रस्त्यांच्या देखभाल आणि दुरूस्तीसाठी प्रत्यक्ष कार्यस्थळी सतत तैनात असावा. खड्डे बुजवण्याची कामे करताना विविध विभागांनी आपसात समन्वय व नियोजन राखावे, असेदेखील श्री. गगराणी यांनी नमूद केले.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर म्हणाले की, २२७ प्रभागातील दुय्यम अभियंत्यांकडे प्रत्येकी १० ते १५ किलोमीटर रस्ते कार्यक्षेत्राची जबाबदारी आहे. फक्त कार्यालयात बसून कोणीही कामकाजाचा आढावा घेऊ नये. प्रत्यक्ष कार्यस्थळास वारंवार भेट देऊन परिस्थिती नियंत्रणात राहिल, हे सुनिश्चित करावे. खड्ड्याच्या दृष्टीकोनातून रस्त्याची पाहणी करताना दुय्यम अभियंत्यांनी दोन दिवसातून एकदा दुचाकीवरून दौरा करावा. जेणेकरून रस्त्याचा संपूर्ण विस्तार नजरेखाली येऊ शकेल. रस्त्याची स्थिती कळू शकेल. स्वयंप्रेरणेने, अधिक सक्रियपणे खड्डे शोधून ते वेळीच भरावेत. तक्रार आल्यानंतर खड्डे भरणे ही अस्वीकारार्ह बाब आहे. अभियंत्यानी सक्रियपणे खड्डे शोधून ते तातडीने भरल्यास नागरिकांना असुविधेचा सामना करावा लागणार नाही.

# पावसाळी पूरस्थिती रोखण्यासाठी फिरते १० उदंचन संच सुसज्ज

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

सखल भागामध्ये साचणाऱ्या पाण्याचा निचरा लवकर व्हावा, यासाठी महानगरपालिकेतर्फे उदंचन संच बसविण्यात येतात. मात्र, विविध कारणांमुळे हे उदंचन पंप कार्यान्वित न झाल्यास सखल भागामध्ये पाणी साचून राहते. त्यामुळे नागरिंना असुविधेचा सामना करावा लागतो. या समस्येवर मात करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने या वर्षी पहिल्यांदाच वाहनांवर आरूढ १० फिरते उदंचन संच ( Vehicle Mounted Mobile Pumps) तयार ठेवले आहेत. या वाहनात २ पंप बसवण्यात आले असून, प्रत्येक पंपाची क्षमता २५० घनमीटर प्रति तास इतकी आहे.

गेल्या काही वर्षात वातावरणीय बदलांमुळे पर्जन्यमानावर परिणाम झाला आहे. हे आता ठळकपणे दिसू लागले आहेत. गेल्या काही वर्षात मुंबईतील काही ठराविक भागात कमी कालावधीत २५० ते ३०० मिलीमीटर पाऊस कोसळल्याची नोंद आहे. यंदा तर मे महिन्यातच पावासाचे आगमन होत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. मुंबईची भौगोलिक रचना विचारात घेऊन महानगरपालिका दरवर्षी पूर व्यवस्थापन उपाययोजना करते. त्यात कमीत कमी वेळेत



पावसाळी पाण्याचा निचरा व्हावा आणि मुंबईकर नागरिकांची गैरसोय होऊ नये, याची दक्षता घेतली जाते.

पावसाळी पाण्याचा निचरा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दरवर्षी विविध उपाययोजना राबविण्यात येतात. त्यात सखल भागांमध्ये ५१४ ठिकाणी पाणी उपसा करणारे उदंचन संच तैनात केल्याचा समावेश आहे. हे उदंचन पंप पावसाळ्यात बंद पडता कामा नये. उदंचन पंपांची यंत्रणा व पर्यायी यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहिली पाहिजे, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

त्यानुसार, पर्जन्य जलवाहिन्या विभागाने उदंचन पंप बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून वाहनावर आरूढ १० फिरते उदंचन संच उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. सन २०२५, २०२६, २०२७ आणि २०२८ या चार वर्षांसाठी भाडेतत्वावर वाहनावर आरूढ फिरते उदंचन संच घेतले जाणार आहेत. प्रत्येक परिमंडळ उपायुक्त कार्यालयासाठी एक, (एकूण ७) आणि पर्जन्य जलवाहिनी विभागाचे उपप्रमुख अभियंता (परिचालन व परिरक्षण), उपप्रमुख अभियंता (पूर्व उपनगरे), उपप्रमुख अभियंता (पश्चिम उपनगरे) यांच्या कार्यालयासाठी प्रत्येकी एक (एकूण ३) अशी त्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रत्येक वाहनावर २ पंप बसविण्यात येणार असून, प्रत्येक पंपाची क्षमता २५० घनमीटर प्रति तास इतकी आहे.

या उपाययोजनेंतर्गत वाहन आरूढ फिरत्या उदंचन संचांची तात्काळ उपलब्धता सुनिश्चित होऊन उद्भवणाऱ्या पूरपरिस्थितीवर वेळीच उपाय करणे शक्य होणार आहे. तातडीच्या प्रसंगी या पर्यायी व्यवस्थेचा प्रतिसाद कालावधी कमी असला पाहिजे. जेणेकरून फिरते उदंचन संच तातडीने घटनास्थळी पोहचवता आले पाहिजेत. या वाहनांवर तीन सत्रांमध्ये म्हणजे २४ तास मनुष्यबळ उपलब्ध हवे, असे निर्देश अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

# जेजे रुग्णालयात निवासी डॉक्टरने घेतला गळफास

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

मुंबईतील जेजे रुग्णालयातील हुशार निवासी डॉक्टर म्हणून परिचित असलेले रोहन प्रजापती यांनी वसतिगृहाच्या खोलीतील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. रविवारी रात्री हा प्रकार घडला. त्यांच्या आत्महत्येची कारणे स्पष्ट होऊ शकली नाहीत.

डॉ. प्रजापती एमबीबीएसच्या तिसऱ्या वर्षात प्रथम श्रेणीचा विद्यार्थी होता. तो अनेकदा वर्गात पहिला आणि दुसरा क्रमांक मिळवत असे. रविवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास तो जेजे हॉस्पिटल कॅम्पसमधील त्याच्या वसतिगृहात अभ्यास करण्यासाठी आला. रात्री साडेनऊच्या सुमारास त्याचा रूममेट आला आणि त्याने आवाज दिला. पण आतून दरवाजा उघडला नाही. खिडकीतून पाहिले असता रोहन फासावर लटकलेला होता.

पुण्यातही रविवारी रात्री डॉ. श्याम वोहरा या निवासी डॉक्टरांनी वसतिगृहात आत्महत्या केली. निवासी डॉक्टरांचे हे वसतिगृह रुबी हॉल क्लिनिकपासून सुमारे ३०० मीटरवर आहे. ढोले पाटील चौकात दामोदर भवन नावाच्या इमारतीतील या वसतिगृहात सुमारे ८० ते १०० डॉक्टर राहतात. डॉ. श्याम वोहरा यांच्या खोलीचा दरवाजा बराच वेळ बंद होता, सुरक्षा रक्षकाला संशय आला. दरवाजा तोडला असता डॉ. वोहरा यांच्या आत्महत्येचा उलगडा झाला. आत्महत्येपूर्वी पूर्वी डॉ. वोहरा यांनी मोबाईलचा पासवर्ड एक कागदावर लिहिला होता.

# प्रकल्पासाठी युनिक आयडी बंधनकारक

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

विविध योजनांच्या पूर्ततेसाठी पैशांची जुळवाजुळव करण्यात महायुती सरकारची दमछाक झाली आहे. त्यामुळे प्रशासकीय खर्चावर नियंत्रण आणत आता प्रकल्पाच्या खर्चात बचत करणे, पायाभूत सुविधांना डिजिटल ओळख निर्माण करणे, निधीचा अपव्यय टाळणे यासाठी राज्य सरकारने आता प्रत्येक पायाभूत प्रकल्पासाठी युनिक आयडी बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक विभागात टप्प्याटप्प्याने युनिक आयडी जारी करण्यात येणार असून १ ऑक्टोबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये युनिक आयडीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. दरम्यान, प्रत्येक पायाभूत सुविधा कामांचे जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

राज्यातील पायाभूत विकासकामांचे सुयोग्य नियोजन व्हावे, सुसूत्रता यावी, सर्व भागांचा समतोल विकास व्हावा व अनावश्यक खर्चात बचत व्हावी, यासाठी प्रत्येक पायाभूत विकास प्रकल्पांसाठी युनिक आयडी लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी युनिक पायाभूत सुविधा पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये वर्धा जिल्ह्यामध्ये ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंधारण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व जलसंपदा विभागाच्या पायाभूत सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व विभाग व जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने पायाभूत सुविधांसाठी युनिक आयडी देण्यात येईल, उर्वरित सर्व विभाग व जिल्ह्यांमध्ये आणि सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ ऑक्टोबर २०२५ पासून पायाभूत सुविधांसाठी युनिक आयडी देणे, सुरू करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

पायाभूत सुविधा पोर्टलवर लोहमार्ग, राष्ट्रीय महामार्ग, सागरी मार्ग, राज्य महामार्ग, द्रुतगती महामार्ग, उन्नत मार्ग, जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग, पूल, इमारती, विद्यापीठ, महाविद्यालये, शाळा, अंगणवाड्या, गोदामे, शित गृहे, बंदरे, विमानतळ, जेटी, पोलीस स्टेशन, कारागृह, कारखाने, तलाव/धरण/बंधारे, जलस्रोत, पाणलोट क्षेत्र, मलः निस्सारण केंद्र, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, लॉजेस्टीक हब, औष्णिक विद्युत

केंद्र, नवीकरणीय ऊर्जा स्रोत, विद्युत प्रकल्प, सौरऊर्जेवर चालणारे विद्युत संच/पंप, रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, पर्यटन सुविधा, वने झुडपी जंगले, कृषी उत्पादन, सिंचन प्रकल्प, सार्वजनिक शौचालय इत्यादी प्रकारच्या सर्व सार्वजनिक पायाभूत सुविधांचे जिओ टॅगिंग बिंदू, रेषा, बहुभुज स्वरूपात करण्यात येणार असून याबाबत सोमवारी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

# धारावी पुनर्विकासात कोणीही बेघर होणार नाही : श्रीनिवास

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे उद्दिष्ट सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देणे आहे. त्यामुळे येथे प्रत्येक धारावीकराला घर दिले जाईल. कोणीही बेघर होणार नाही. इतर सर्व आधुनिक गृहनिर्माण संस्थांप्रमाणे येथे बहुस्तरीय तळघर पार्किंग, पोडियमच्या मजल्यांवर व्यवसाय आणि व्यावसायिक युनिट्स सामावून घेतल्या जातील. लोक वरच्या मजल्यावर राहतील आणि खालच्या मजल्यावर त्यांचा व्यवसाय चालवतील, अशी माहिती प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एसव्हीआर श्रीनिवास यांनी दिली. श्रीनिवास यांनी सांगितले की, मास्टर प्लान २०१६ च्या विकास आराखड्यावर (डेव्हलपमेंट प्लॅन) आधारित आहे. तो टप्प्याटप्प्याने राबविला जाईल. अंमलबजावणीदरम्यान कोणतेही मोठे बदल प्रस्तावित केले गेले तरच त्यासाठी सूचना आणि हरकतींची प्रक्रिया आवश्यक ठरेल. स्थानिक आणि सरकार यांना एकत्र आणूनच प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल. माटुंगा रेल्वे जमिनीवर बांधकामाचे काम आधीच सुरू झाले आहे. रेल्वे कर्मचारी आणि अधिकारी यांना योग्यरीत्या सामावून घेतल्यानंतर तेथील इमारतीत धारावीकरांना सामावून घेतले जाईल. पुढील तीन वर्षात रेल्वे इमारती पूर्ण होतील. बांधकाम आणि विकासकामे ही समांतरपणे केली जातील.

# म्हाडाचा लोकशाही दिन; 8 अर्जांवर सुनावणी

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) सोमवारी वांद्रे (पूर्व) येथील गृहनिर्माण भवनात बारावा लोकशाही दिन पार पडला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या लोकशाही दिनात नागरिकांच्या ८ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली. गोरेगाव पश्चिम येथील स्नेहदीप सोसायटीच्या मोकळ्या जागेत अनधिकृत बांधकाम केल्याच्या विरुद्ध संजय भैरे यांनी अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी करताना जयस्वाल यांनी सोसायटीच्या आवारातील मोकळ्या जागेवर होत असलेला अनधिकृत वापर तत्काळ थांबवण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच अनधिकृत बांधकामाबाबत पाहणी करून येत्या सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देखील दिले.

लोकशाही दिनात मुंबई मंडळाशी संबंधित ४, मुंबई इमारत दुरुस्ती मंडळ ३, छत्रपती संभाजी मंडळाशी संबंधित १ अर्जावर सुनावणी घेण्यात आली.

# संत निरंकारी मिशनतर्फे आयोजित नेत्रचिकित्सा शिबिरात ४१० नागरिक लाभान्वित



**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे रविवारी ८ जून २०२५ रोजी संत निरंकारी सत्संग भवन, चेंबूर, मुंबई येथे मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ सुमारे ४१० गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मिळाला.

या शिबिरात ६७ रुग्णांना मोतीबिंदू झाल्याचे आढळून आले असून त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रियेसाठी के.बी.हाजी बच्चू अली चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई येथे संदर्भित करण्यात आले आहे. याशिवाय १३३ रुग्णांना तपासणीनंतर नंबर लावून चष्मे देण्यात आले. इतरांना आवश्यक त्या औषधांचा पुरवठा व डोळ्यांची निगा राखण्यासाठी मार्गदर्शनही करण्यात आले.

या शिबिरामध्ये के.बी. हाजी बच्चुअली नेत्र रुग्णालयाचे डॉक्टर्स व वैद्यकीय तंत्रज्ञ यांच्या ८ सदस्यीय टीमने नेत्र चिकित्सेची सेवा निभावली.

मिशनच्या समाज कल्याण विभागाच्या श्रीमती प्रेमा ओबेरॉय यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. शिबिराचा शुभारंभ ब्रह्मज्ञान प्रचारक श्री.बाबूभाई पांचाळ यांच्या उपस्थितीत सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकार प्रभूच्या प्रति प्रार्थनेद्वारे करण्यात आला. सेक्टर संयोजक आ. विजय विचारे आणि सेवादल स्वयंसेवकांच्या सहाय्याने हे शिबिर यशस्वीरित्या राबविण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून एक महत्त्वाचा संदेशही देण्यात आला, की "जीवनासाठी दृष्टी गरजेची आहे, डोळ्यांच्या आरोग्याला प्राधान्य द्या."

उल्लेखनीय आहे, की संत निरंकारी मिशनच्या वतीने यासारखेच मोफत नेत्र तपासणी शिबिर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी वर्ली नाका महानगरपालिका शाळेत सकाळी ९ ते १ या वेळेत आयोजित केले जाते. त्याची नोंदणी सकाळी ९ ते ११ दरम्यान होते. हे शिबिरही सर्वांसाठी मोफत आहे.

# रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची तात्काळ हकालपट्टी करा - हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून सहा प्रवाशांचा मृत्यू झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असताना, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी थेट रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी करत केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला आहे.

“हा केवळ अपघात नाही, तर केंद्रातील भाजपा सरकारच्या निष्क्रियतेचा थेट बळी आहे,” असा गंभीर आरोप करत सपकाळ म्हणाले की, “जीवाची पर्वा न करता लोकलला लटकून प्रवास करणं हे मुंबईकरांचं दैनंदिन वास्तव बनलं आहे. ही परिस्थिती विदारक असून मन सुन्न करणारी आहे.”

पायाभूत सुविधा आणि मुंबईकरांच्या प्रवासाच्या नावाखाली गेल्या अनेक वर्षांपासून टेंडर द्या आणि कमिशन घ्या हा भ्रष्ट कारभार सुरु असल्याचा आरोप करत सपकाळ म्हणाले, “सरकार, अधिकारी आणि ठेकेदार यांचं अपवित्र त्रिकूट सध्या गब्बर झालं आहे. पण या भ्रष्टाचाराची किंमत सामान्य माणसाला आपला जीव गमावून चुकती करावी लागते आहे.”

तसेच, “मुंबईकरांना बुलेट ट्रेन नको, त्यांना सुरक्षित आणि सुरळीत लोकल सेवा हवी आहे,” असं ठाम मत व्यक्त करत त्यांनी बुलेट ट्रेन प्रकल्पावरही घणाघाती टीका केली.

“दर अपघातानंतर लोकलमधून पडणं थांबवण्यासाठी ‘बंद दरवाज्यांची घोषणा’ होते, पण प्रत्यक्षात कृती शून्य असते,” अशी टीका करत सपकाळ यांनी सरकारला इशारा दिला की, “आता तरी इव्हेंटबाजी थांबवा आणि मुंबईकरांचा जीव वाचवण्यासाठी तात्काळ कृती करा.”

त्यांनी नमूद केले की, दररोज ७५ लाख मुंबईकर लोकलने प्रवास करतात आणि प्रत्येक प्रवास हा एका युद्धासारखा असतो. घरातून निघालेला माणूस परत येईल की नाही याची शाश्वती राहत नाही.

“सर्वच पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी वारंवार लोकलच्या समस्यांवर आवाज उठवला आहे, पण रेल्वे प्रशासन आणि सरकार यांची कुंभकर्णी झोप काही केल्या मोडत नाही,” अशी टीका त्यांनी केली.

“मुंबईच्या हृदयात घर करून राहिलेली लोकल सेवा आता मृत्यूचा सापळा बनत चालली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची जबाबदारी ठरवून त्यांची तात्काळ हकालपट्टी झालीच पाहिजे,” असा ठाम आग्रह हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या निवेदनात मांडला.

मुंबईच्या जनतेने आता सरकारकडून केवळ आश्वासनं नव्हे, तर ठोस कृतीची अपेक्षा ठेवली आहे — आणि ती वेळ आता आली आहे!

## महत्त्वाच्या बातम्या

### घरफोडीप्रकरणी चौघांना अटक

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

कुरार पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळल्या आहेत. मालाड पूर्वेकडील अष्टविनायक चाळीत राहणारे नाझीर खान (३८) यांनी त्यांच्या घरातील शंभर ग्रॅम सोने आणि २४० ग्रॅम चांदी तसेच ८० हजारांची रोख रक्कम अनोळखी व्यक्तीने चोरून नेल्याची तक्रार ४ जून रोजी केली होती. याप्रकरणी परिमंडळ १२ चे पोलीस उपायुक्त महेश चिमटे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने यशस्वी तपास करत एका महिलेसह चार जणांना अटक केली. अब्दुल रफिक अन्सारी ऊर्फ अप्पू खोटा (२९), दीपाली भूल ऊर्फ दुपारी शर्मा (२४), सूरज जाधव (२९) आणि आकाश पवार (२५) अशी आरोपींची नावे आहेत. त्यातील दीपाली ही गृहिणी, सूरज हा रिक्षाचालक तर आकाश हा डिलिव्हरी बॉय आहे. पोलिसांनी त्यांना अटक करत चोरीला गेलेला सर्व ऐवज त्यांच्याकडून हस्तगत केली. यातील अब्दुलवर कुरार पोलिसांसह दिंडोशी, आरे पोलिसात ४० पेक्षा अधिक घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

### राज्यात १३ जूनपासून मान्सून सक्रिय होणार

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

राज्यात १३ जूनपासून हवेचे दाब कमी होत आहेत. त्यामुळे मान्सून सक्रिय होईल. याची १० जूनपासूनच काही भागांत सुरुवात होईल. त्यामुळे सर्वच जिल्ह्यांना आगामी चार दिवस 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. १२ आणि १३ जून रोजी कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दक्षिण द्वीपकल्पीय भारतात मान्सून सक्रिय होत आहे. त्यामुळे १२ ते १५ जूनदरम्यान कर्नाटकात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्रात होत आहे. कारण हवेचे दाब १०१० हेक्टा पास्कलवरून १००४ ते १००० हेक्टा पास्कल इतके होत आहेत. प्रामुख्याने कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अतिवृष्टीची शक्यता आहे. या भागात वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ७० किलोमीटर इतका वाढणार आहे. हवेच्या वरच्या थरात चक्राकार स्थिती तयार होत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर १३ जूनपासून जोरदार पावसाचे संकेत आहेत.

### एटीएम मशीन फोडून ३ लाखांची चोरी

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

कुर्ला पूर्वेकडील नेहरूनगर येथे असलेल्या अभ्युदय बँकेचे एटीएम मशीन फोडून तीन चोरांनी ३.०७ लाखांच्या रोख रकमेची चोरी केल्याची घटना ७ जून रोजी सकाळी घडली. याप्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल करून नेहरूनगर पोलीस एटीएम सेंटर आणि आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपींचा शोध घेत आहेत. अभ्युदय बँकेच्या कुर्ला, नेहरूनगर येथील शाखेचे मुख्य व्यवस्थापक संतोष शेळके यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, बँकेच्या आवारात असलेल्या एटीएम सेंटरमध्ये ही घटना घडली. यातील तीन कथित आरोपींनी बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये प्रवेश करत कोणत्या तरी वस्तूच्या सहाय्याने एटीएम मशिनचा खालीच्या बाजूला असलेला दरवाजा उघडून मशीनमधील ३.०७रोख रक्कम व एक कॅसेट बॅगेत भरून चोरी केला.

बँकेतील हेड कॅशिअर अनिल लाळगे आणि अधिकारी सुनील कंधारे यांनी बँकेच्या एटीएम मशीनमध्ये ५ जूनच्या दुपारी ५०० रुपयांच्या ६०० नोटा म्हणजेच तीन लाख रुपये भरले होते. त्यावेळी एटीएम मशीनमध्ये आधीची रक्कम ५ लाख ०७ हजार ५०० रुपये रक्कम होती. ७ जूनला बकरी ईद सणामुळे बँकेला सुट्टी होती. याच दिवशी सकाळी तीन चोरांनी बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये घुसून ३.०७ लाख रुपये रोख रक्कम आणि कॅसेट चोरी केली.

### सोनसाखळी चोराला बेड्या

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

दादर येथील टी टी परिसरातून पायी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पसार झालेल्या दोन आरोपींना माटुंगा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. सलीम मतीन सय्यद ऊर्फ मोजेस (४४) आणि अकबर अहमद सय्यद (४५) अशी अटक आरोपींची नावे आहेत. १८ मे च्या रात्री सव्वा नऊ वाजता यातील तक्रारदार महिला टिळक ब्रिजच्या फुटपाथवरून दादर टी. टी. च्या दिशेने पायी चालत होती. मागावर आलेल्या आरोपीने तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. महिलेच्या तक्रारीवरुन याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करुन माटुंगा पोलिसांनी तपास सुरू केला. तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने पोलिसांनी माहीम पश्चिम, कपडा बाजार येथील रहिवासी सलीम सय्यद ऊर्फ मोजेस आणि माहिममधील बालामिया लेन येथील रहिवासी अकबर सय्यद यांना ताब्यात घेत अटक केली. माटुंगा पोलीस ठाण्यात दाखल असलेला आणखी एक गुन्हा सय्यद ऊर्फ मोजेस याने केल्याचे तपासात उघड झाले. पोलिसांनी या दोन्ही आरोपींकडून गुन्ह्यातील सोने वितळवून तयार केलेल्या ११.९८० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या लगड जप्त केल्या आहेत.

### 'निकालांवर संशय घेणे हा बालिशपणा'

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

'भारतातील निवडणूक आयोग आणि निवडणूक प्रक्रिया ही एक मजबूत व्यवस्था आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालांवर संशय घेणे हा बालिशपणा आहे,' अशी घणाघाती टीका शिवसेनेचे उपनेते संजय निरुपम यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर केली. 'बिहार निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगावर संशय व्यक्त करून खोटी धारणा पसरवण्याचा गांधी यांचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे,' असे ते म्हणाले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. 'महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा सपशेल पराभव झाला. केवळ १६ आमदार निवडून येणे ही काँग्रेसची आजवरची सर्वांत मानहानिकारक कामगिरी ठरली व ते राहुल गांधी यांच्या पचनी पडलेले नाही. काँग्रेस आणि मतदारांमधील संबंध तुटलेला आहे. मतदारांना काय हवे आहे याची राहुल यांना जाणीव नसल्याने ते वारंवार पराभूत होत आहेत,' असेही निरुपम म्हणाले.

### हॉर्न वाजवल्याच्या रागातून मारहाण

**नवी मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

हॉर्न वाजवून बाजूला होण्यास सांगितल्याच्या रागातून सहा तरुणांनी मोटारसायकलवरून जाणाऱ्या दोघांना बेदम मारहाण केल्याची घटना पनवेलमध्ये घडली. या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी, मारहाण करणाऱ्या त्या तरुणांचा शोध घेऊन त्यापैकी चार आरोपींना रविवारी अटक केली. त्यांच्या दोन अल्पवयीन साथीदारांना नोटीस बजावली आहे.

तक्रारदार दीपक मोहिते (४६) हे पनवेलच्या साई नगरमध्ये राहण्यास आहेत. शनिवारी सांयकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास ते रणधीरकुमार सिंग (३६) या मित्रासह मोटारसायकलवरून घरी जात होते. यावेळी सहा तरुण तीन स्कूटरवरून रस्ता अडवून, गप्पा मारत जात होते. दीपक यांनी हॉर्न वाजवून त्यांना रस्ता सोडण्यास सांगितले. याचा स्कूटरचालक तरुणांना राग आल्याने त्यांनी मोहिते यांची मोटारसायकल अडवून त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर त्या सर्वांनी दीपक व रणधीरकुमार या दोघांना भररस्त्यात लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आणि ते पळून गेले. या मारहाणीत रणधीर कुमार सिंग हे गंभीर जखमी झाले असून या दोघांनी रुग्णालयात उपचार घेऊन पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी शोध घेऊन सहा जणांना ताब्यात घेतले.




## अकाली रजोनिवृत्तीचं व्यवस्थापन

जीवनशैली
डॉ. मेघा दळे



आजकाल महिलांना ऑफिसच्या ताण-तणावामुळे आणि घरातील कामांमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. त्यामुळे आरोग्याशी संबंधित समस्या वाढू लागल्या आहेत. त्यातही महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. रजोनिवृत्तीच्या वेळी होणारा त्रास ही एक गंभीर समस्या बनली आहे. शक्यतो ४५ ते ५५ या वयात रजोनिवृत्ती येते; परंतु चुकीची जीवनशैली आणि इतर काही कारणांमुळे काही महिला ३० ते ४० या वयातच या अवस्थेतून जात आहेत. याचा महिलांवर केवळ शारीरिक नाही, तर मानसिक आणि भावनिकदृष्ट्याही खोलवर परिणाम होतो.

कोणत्याही महिलेला अशी लक्षणे जाणवत असतील, तर ती हलक्यात घेऊ नका. कुटुंबातील महिलांना आधीच वेळेपूर्वीच रजोनिवृत्ती आली असेल तर त्यामुळे अनेक समस्या उद्‌भवू शकतात. वेळेवर निदान, योग्य उपचार आणि काळजी घेतल्यास गुंतागुंत टाळता येते. रजोनिवृत्ती वेळेपूर्वी येण्यासाठी खालील कारणं कारणीभूत ठरतात.

✲ **आरोग्य समस्या:** थायरॉईड, ऑटोइम्यून डिसऑर्डर.

✲ **जीवनशैली:** ताणतणाव, खाण्याच्या वाईट सवयी, जास्त धूम्रपान किंवा मद्यपान.

✲ **शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय कारणं:** अंडाशय किंवा गर्भाशयावर शस्त्रक्रिया, केमोथेरपी.

✲ **लहान वयात रजोनिवृत्तीची लक्षणं:** मासिक पाळी अनियमित होते किंवा अचानक थांबते. उष्णता आणि घाम येणं.

✲ **निद्रानाश किंवा झोपेचा अभाव:** मूड स्विंग्स, चिडचिडेपणा आणि नैराश्य. शरीरात थकवा आणि अशक्तपणा जाणवणं. त्वचा कोरडी पडणं आणि केस गळणं. लैंगिक इच्छा कमी होणं आणि वेदनादायक संभोग.

**काय काळजी घ्यावी?**

✲ **निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा:** संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि तणाव कमी करणं आवश्यक आहे.

✲ **वैद्यकीय सल्ला घ्या:** हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीची आवश्यकता असू शकते.

✲ **नियमित तपासणी:** हार्मोन्सची पातळी तपासा आणि हाडांकडे लक्ष द्या.

✲ **मानसिक आरोग्य काळजी:** ध्यान, योग आणि विश्रांती या तीन बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत. लहान वयात रजोनिवृत्ती येणं ही गंभीर बाब आहे. त्यामुळे दुर्लक्ष करणं आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं.

## गुडघेदुखीकडे दुर्लक्ष नको

दुखापत
डॉ. अजिंक्य बोन्हाडे



खेळताना गुडघा वेडावाकडा वाकल्यास किंवा त्याला अचानक मार बसल्यास गुडघ्याच्या दुखापती होतात. गुडघा हा शरीरातील सर्वात महत्त्वाच्या सांध्यांपैकी एक आहे. चालण्यास, धावण्यास, उडी मारण्यास, खाली बसण्यास तसेच उठून उभं राहण्यास गुडघे मदत करतात.

गुडघ्यांमध्ये आत धाग्यांसारख्या काही ऊती असतात. त्या सांधा मजबुतीने एकत्र जोडून ठेवण्यास मदत करतात. त्यांना अस्थिबंधन (लिगामेंट्स) म्हणतात. हे अस्थिबंधन गुडघ्याचे सांधे स्थिर राखण्यात मदत करतात. कधीकधी अचानक पडणं, पाय मुरगळणं, गुडघा वाकणं किंवा खेळाच्या दुखापतीमुळे अस्थिबंधनावर ताण येऊ शकतो किंवा ते फाटू शकतात. याला गुडघ्याच्या अस्थिबंधनाची दुखापत असं म्हणतात. या दुखापती व्यायाम करणाऱ्या, मैदानी खेळ खेळणाऱ्या आणि धावताना अचानक दिशा बदलणाऱ्या व्यक्तींमध्ये अधिक सामान्य आहेत.

**उपचार न घेतल्यास दीर्घकालीन समस्या**

गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतींमुळे तीव्र वेदना, सूज आणि हालचालींवर मर्यादा येऊ शकतात. याकडे दुर्लक्ष केल्यास किंवा उपचार न केल्यास गुडघ्याचे सांधे कमकुवत होऊन दीर्घकालीन समस्यांना आमंत्रण मिळू शकतं. योग्य काळजी आणि विश्रांती घेतल्यास या दुखापती बऱ्या होऊ शकतात आणि भविष्यातील समस्यादेखील टाळता येतात.

**गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतीचे प्रकार**

✲ **एसीएल दुखापत (अँटीरियर क्रूशिएट लिगामेंट):** हा गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतीचा सर्वात सामान्य प्रकार आहे. फुटबॉल, बास्केटबॉल किंवा जिम्नॅस्टिक्ससारखे खेळताना या प्रकारची दुखापत होऊ शकते. अचानक थांबताना, उडी मारताना अनाठायीपणे उतरताना किंवा अचानक दिशा बदलतानाही ती होऊ शकते. अँटीरियर क्रूशिएट लिगामेंट इजा (एसीएल) झाली असेल तर रुग्णामध्ये तीव्र वेदना, दुखापतीनंतर लगेच सूज येणं, वजन सहन न होणं आणि सांधे कडक होणं अशी लक्षणे दिसून येतात.

✲ **पीसीएल दुखापत (पोस्टेरियर क्रूशिएट लिगामेंट):** गुडघ्यामध्ये या विशिष्ट प्रकारच्या अस्थिबंधनाच्या दुखापती गुडघ्याच्या पुढच्या बाजूला असलेल्या जोरदार आघातामुळे होतात. पोस्टेरियर क्रूशिएट लिगामेंट दुखापतीमुळे लगेचच तीक्ष्ण वेदना होत नाहीत; परंतु कालांतराने परिस्थिती आणखी बिकट होऊन चालण्यास त्रास होऊ शकतो.

✲ **एमसीएल (मेडियल कोलॅटरल लिगामेंट):** दुखापत झाल्यावर गुडघा एका बाजूला खूप वाकतो. गुडघे सरळ ठेवणं किंवा वाकवणंदेखील कठीण होऊ शकतं. गुडघ्याच्या आतील बाजूस जास्त दाब पडल्याने बाहेरील भागावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे एलसीएल (लॅटरल कोलॅटरल लिगामेंट) दुखापत होऊ शकते. प्रभावित भाग सुजू शकतो आणि चालताना किंवा गुडघे वाकवताना त्रास होऊ शकतो.

**काय करावं?**

गुडघ्याची स्थिरता पुनर्संचयित करण्यासाठी आणि हालचालीची श्रेणी सुधारण्यासाठी रुग्णाला आर्थ्रोस्कोपिक पद्धतीने अस्थिबंधन दुरुस्तीचा सल्ला दिला जातो. ही 'मिनिमली इन्व्हेजिव्ह' शस्त्रक्रिया आहे. सांध्यातील दुरुस्तीचे मार्गदर्शन करण्यासाठी विविध उपकरणं वापरली जातात. ही उपकरणं आणि कॅमेऱ्याच्या मदतीने फाटलेले किंवा खराब झालेले अस्थिबंधन दुरुस्त केले जातात.

## उच्च रक्तदाब धोकादायकच

व्याधीविकार
डॉ. दत्तात्रय मुळे



उच्च रक्तदाबामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळू शकतं. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि चुकीचा आहार यामुळे कमी वयातच हा विकार जडू लागला आहे. तसं पाहिलं तर उच्च रक्तदाब हा आजार नाही; परंतु उच्च रक्तदाबामुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात आणि ते प्राणघातक ठरू शकतात.


उच्च रक्तदाब हे आधुनिक जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे उद्‌भवणारी आरोग्य समस्या आहे. हल्लीच्या काळात उच्च रक्तदाबाचे अगदी विशीतले रुग्णही आढळून येत आहेत. काही प्रकरणांमध्ये तर १४-१५ वर्षे वयोगटातील मुलांमध्येही उच्च रक्तदाब दिसून येतो. जास्त चरबीयुक्त आहार आणि कमी शारीरिक हालचाल ही याची मुख्य कारणं आहेत. रक्तदाब जास्त असतो, तेव्हा सुरुवातीला फार गंभीर लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे ते गांभीर्याने घेतलं जात नाही.

**शरीराचं मोठं नुकसान**

काही काळानंतर उच्च रक्तदाब गंभीर बनतो आणि शरीराला मोठं नुकसान पोहोचवू शकतो. सतत वाढणारा रक्तदाब हृदयविकार आणि स्ट्रोक या दोन घातक आजारांना कारणीभूत ठरतो. दोन्ही विकारांमध्ये वेळेवर उपचार मिळाले नाहीत, तर रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. हृदयविकाराच्या झटक्यानंतर आयुष्य पूर्णपणे बदलतं. रुग्णाला आयुष्यभर संतुलित आहार घ्यावा लागतो आणि स्ट्रोक (मेंदूतील रक्तस्राव) झाल्यास, कधीकधी रुग्ण चालण्याच्या स्थितीतही नसतो.

## का मंदावते रोगप्रतिकारशक्ती?

वेगळं काही



अनेकजण आरोग्याबाबत खूप दक्ष असतात. काहीही खाण्याआधी हात स्वच्छ धुतात. पोषक आहाराचं आणि जीवनसत्त्वयुक्त गोळ्यांचं नियमित सेवन करतात. आजारी माणसापासून शक्य तितकं लांब राहतात. स्वतःची प्रत्येक वस्तू बॅक्टेरियामुक्त असेल याची काळजी घेतात. मात्र एवढं करूनही सर्दी, खोकला, तापाचे जंतू त्यांच्या शरीरात प्रवेश करण्यात यशस्वी ठरतात. एवढी काळजी घेऊनही आपण का आजारी पडलो, असा प्रश्न डॉक्टरांना विचारला जातो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होण्यामागे काही वेगळी कारणंही असू शकतात. याच कारणांचा उहापोह करण्याचा हा प्रयत्न...

सध्या वायू प्रदूषणाचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. हे प्रदूषण फक्त फुफ्फुसांवरच आघात करतं असं नाही तर रोगप्रतिकारक शक्तीही कमी करतं. प्रदूषित हवा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या 'टी' पेशींवर प्रभाव टाकते. त्यामुळे बराच काळ प्रदूषित वातावरणात घालवल्यानंतर आजारपण येऊ शकतं. वातावरणातला हवेचा दर्जा सुधारणं शक्य नसलं तरी चांगला एअर प्युरिफायर आणि चांगला फेस मास्क विकत घेता येईल.

प्रथिनांच्या अतिसेवनामुळेही रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. प्राणीजन्य पदार्थांमधून मिळणाऱ्या प्रथिनांमुळे शरीरात 'वन जीएफ वन' हार्मोन्सची निर्मिती होते. या हार्मोनमुळे वय वाढण्याची प्रक्रिया वेगवान होते आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळे दुग्धजन्य उत्पादनं, मांस अशा प्राणीजन्य पदार्थांमधून मिळणाऱ्या कॅलरींचं प्रमाण तुम्ही घेत असलेल्या दैनंदिन कॅलरींच्या तुलनेत दहा टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, याची काळजी घ्या. यानंतरही त्रास सुरू राहिला तर प्राणीजन्य पदार्थांमधून घेतल्या जाणाऱ्या कॅलरींचं प्रमाण पाच टक्क्यांवर आणा.

एकाकी आयुष्य जगणाऱ्या लोकांवर अधिक ताण येतो. याच कारणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्तीही कमी होते. म्हणूनच एकटेपणा टाळण्यासाठी प्रयत्न करावा. कुटुंबिय, मित्रमंडळी, सहकारी यांच्यासह अधिकाधिक वेळ घालवण्याचा प्रयत्न करावा. सर्वांमध्ये मिळून-मिसळून राहणारे रोगांचा अधिक चांगल्या प्रकारे सामना करू शकतात.

## तरुणांनाही सतावतेय केसगळती

केसांचं आरोग्य
डॉ. दीप्ती नेने

आजकाल केस गळतीची समस्या गंभीर बनली आहे. बदललेली जीवनशैली, ताणतणाव आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे लोकांच्या डोक्यावरील केस गळत आहेत.



केसगळतीच्या समस्येने ग्रस्त असलेले तरुण केस प्रत्यारोपण करून घेत आहेत. काही आजार आणि पोषणाच्या कमतरतेमुळेदेखील केसगळती होऊ शकते. केसगळतीमागे पोषणाचा अभाव हे कारणही असू शकतं. केसगळतीवर केस प्रत्यारोपणाच्या पर्यायाचा अवलंब केला जातो. ही प्रक्रिया खर्चिक तर आहेच, पण तज्ज्ञ व्यक्तीकडून करून न घेतल्यास ती जीवघेणीही ठरू शकते.

**केस का गळतात?**

आजारांव्यतिरिक्त केस गळतीची समस्या पोषणाच्या कमतरतेमुळे उद्‌भवते. पोषणाचा अभाव पूरक आहारांद्वारे भरून काढता येतो. एखाद्या आजारामुळे केसगळती होत असेल तर चांगल्या डॉक्टरांकडून उपचार घ्यावेत. आपल्या शरीरात काही जीवनसत्त्वांची कमतरता असू शकते. त्यामुळे केस अकाली गळू लागतात. ड, ब ७, ई या जीवनसत्त्वांचा तसेच झिंक आणि लोहाच्या कमतरतेमुळे केस गळतात. केसांच्या आरोग्यासाठी हे घटक आवश्यक असतात. याशिवाय काही आजारांमुळे केस गळू लागतात. विविध तपासण्यांनंतर केस गळतीची मुख्य कारणं ठरवली जातात. जीवनसत्त्वं आणि इतर घटकांची कमतरता लवकर दूर होऊ शकते. केस वेगाने गळत असतील आणि कोणताही आजार नसेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. शरीरातील पोषक तत्वांची कमतरता ओळखून, डॉक्टर तुम्हाला योग्य पूरक आहार सुचवू शकतात.

## तक्रारी दूर करणारं त्रिफळा

आयुर्वेद आणि विकार

आपण त्रिफळा हे नाव बरेचदा ऐकलं आहे. त्रिफळा म्हणजे आवळा, हरीतकी आणि बिभितिका या तीन फळांचं मिश्रण. हरीतकी या फळात विविध आजार बरे करण्याची क्षमता आहे. त्यातले अँटिऑक्सिडंट्स खूप प्रभावी असतात.



बिभितिका हे सुद्धा एक फळ आहे. यात बॅक्टेरिया आणि फंगसविरोधी गुणधर्म असतात. दाह कमी करण्याच्या गुणधर्मामुळे बिभितिका विविध विकारांवर प्रभावी ठरतं. आवळा खूप गुणकारी आहे. यात 'क' जीवनसत्त्व असतं. आवळ्याच्या सेवनाने शरीरातली उष्णता कमी होते. यासोबतच रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. तीन अत्यंत गुणकारी फळांपासून बनलेलं त्रिफळा चूर्ण विविध विकारांवर प्रभावी ठरतं. यातलं 'क' जीवनसत्त्व, अँटीऑक्सिडंट्स तसंच इतर घटकांमुळे केस आणि त्वचेचं आरोग्य सुधारतं. त्रिफळाच्या नियमित वापरामुळे केसांची मुळं बळकट होतात.

केस आणि त्वचेशी संबंधित समस्या असतील तर त्रिफळाचा नियमित वापर करता येईल. त्रिफळामुळे केस गळणं कमी होतं आणि केस छान वाढू लागतात. त्रिफळायुक्त टॉनिक्समुळे कोंडयाचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. तसंच केसांच्या इतर तक्रारीही दूर होतात. त्रिफळामुळे स्कॅल्पच्या पीएच बॅलन्स राखला जातो. परिणामी केस मजबूत होतात.

## कोलेस्टेरॉल वेळीच ओळखा

आरोग्यचर्चा
डॉ. कुंदन गायकवाड

कोलेस्टेरॉलबद्दल बरेच समज-गैरसमज पाहायला मिळतात. ते वाईटच असतं हा ही एक गैरसमजच. शरीरासाठी कोलेस्टेरॉलदेखील आवश्यक आहे. कोलेस्टेरॉलचे दोन प्रकार असतात. एक चांगला आणि दुसरा वाईट. जर वाईट कोलेस्टेरॉल वाढलं, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

**लक्षणं कोणती?**

चांगलं कोलेस्टेरॉल वाईट कोलेस्टेरॉलला नियंत्रित करतं. म्हणून शरीरात चांगल्या कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न केले पाहिजेत. चांगले कोलेस्टेरॉल अधिक असेपर्यंत वाईट कोलेस्टेरॉल फार नुकसान करत नाही. वाईट कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे त्वचेवर काही बदल दिसून येतात. यामध्ये त्वचेवर पिवळे किंवा पांढरे डाग पडणं, त्वचेचा रंग बदलणं आणि डोळ्यांभोवती गाठी येणं यासारखी लक्षणे असू शकतात. याशिवाय त्वचेवर इतर अनेक ठिकाणीही गाठी दिसू शकतात.




उपचारानंतर गाठी कमी होत जातात. कोलेस्टेरॉल वाढतं तेव्हा डोळे, कोपर, गुडघे किंवा टाचांभोवती पिवळे किंवा पांढरे डाग पडतात किंवा गाठी तयार होऊ शकतात. त्वचेवर लाल पुरळ येऊन खाज सुटते. पापण्या आणि त्वचेवर मेणासारखे पिवळे-केशरी रंगाचे डाग दिसू शकतात.

**लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका**

ही लक्षणं जाणवल्यास ताबडतोब कोलेस्टेरॉलची पातळी तपासायला हवी. दिनक्रम आणि आहारात योग्य बदल करायला हवा.

## आहार मधुमेहींचा

आहारतंत्र



मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी योग्य आणि पोषक आहार घेणं गरजेचं असतं. रक्तातली साखरेची पातळी वाढू नये यासाठी काय करता येईल हे जाणून घेऊ.

मधुमेहींनी तळलेल्या पदार्थांऐवजी भाजलेल्या किंवा बेक केलेल्या पदार्थांची निवड करावी. तळकट पदार्थांमध्ये कॅलरी आणि मेदाचं प्रमाण अधिक असतं तर भाजलेल्या पदार्थांमधली पोषकमूल्यं टिकून राहतात.

मधुमेहींनी फळांचे रस पिण्याऐवजी फळं खाण्याला प्राधान्य द्यायला हवं. मधुमेहींना मर्यादित प्रमाणात फळं खाता येतील. तसंच ग्लायसेमिक इंडेक्स कमी असणारी फळं खाणं अधिक आरोग्यदायी ठरतं.

फळांच्या रसात फायबर नसतं. तसंच रस काढण्यासाठी अधिक फळांचा वापर झाल्याने साखरेचं प्रमाण वाढतं. मात्र फळांमधून आवश्यक ते पोषक घटक मिळू शकतात.

वेफर्स, बिस्किटांऐवजी बदाम, आक्रोड, पिस्ता, शेंगदाणे खाता येतील. यातल्या पोषक घटकांमुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहील.

नवसंशोधन

### फायबरमुळे कॅन्सरला प्रतिबंध!


आहारातल्या तंतूमय पदार्थांचं म्हणजे फायबरचं महत्त्व आपण जाणतोच. फायबरमुळे पचनशक्ती सुधारते. रक्तातलं कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यातही फायबर महत्त्वाची भूमिका बजावतं. मधुमेहींच्या आहारात फायबरचा समावेश असणं गरजेचं असतं. फायबरमुळे हे लाभ होतातच. शिवाय फुफ्फुसांच्या कर्करोगाची शक्यता अनेकपटींनी घटत असल्याची बाबही एका संशोधनातून समोर आली आहे. वँडरबिल्ट विद्यापीठातल्या संशोधकांनी यावर प्रकाश टाकला आहे. जामा ऑन्कोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे. या संशोधनाच्या निष्कर्षांसाठी अमेरिका, युरोप आणि आशिया खंडातल्या सुमारे १.४ दशलक्ष प्रौढांचा अभ्यास करण्यात आला.



दंतारोग्य

### एनॅमलचा थर टिकवण्यासाठी...


दातांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची संख्या कमी नाही. पण दातांकडे झालेलं दुर्लक्ष तुम्हाला चांगलंच महागात पडू शकतं. नियमित दात घासल्यानंतरही त्यावरचा एनॅमलचा थर नष्ट होण्याचा धोका असतो.




गोड पदार्थ आणि आहारातल्या कर्बोदकांमुळे हा थर कमी होत जातो. गोड पदार्थ आणि कर्बोदकांमुळे आपल्या लाळेत आम्लाचं प्रमाण वाढतं आणि हे आम्ल दातांवरचं एनॅमलचं प्रमाण कमी करतं. एनॅमल कमी झाल्यामुळे आपले दात संवेदनशील होतात. थंड किंवा गरम पदार्थांचं सेवन केल्यानंतर झिणझिण्या जाणवतात. दातांमधली झीज, पिवळेपणा अशा समस्यांना सामोरं जावं लागतं. हे टाळण्यासाठी खाल्ल्यानंतर खळखळून चूळ भरायला हवी. यासोबतच फ्लोराइडयुक्त टूथपेस्ट तसंच माउथवॉशचा वापर करायला हवा.

काळजी त्वचेची

### ब्लीच करताय?



बऱ्याच महिला नियमित ब्लीच करतात. बरेचदा घरच्या घरी ब्लीच केलं जातं. ब्लीचमुळे चेहऱ्यावरची लव झाकली जाते. शिवाय त्वचेचा रंग उजळतो. मात्र घरीच ब्लीच करणाऱ्यांनी अधिक काळजी घ्यायला हवी. बाजारात अनेक कंपन्यांची ब्लीच मिळतात. आपल्या त्वचेला साजेशा ब्लीचची निवड करा. महत्त्वाची बाब म्हणजे ब्लीच हाताऐवजी ब्रशने लावा. ब्लीच चेहऱ्यावर १५ मिनिटांपेक्षा अधिक काळ ठेऊ नका. वाळलेले ब्लीच टिश्यू पेपर किंवा कापसाने काढून टाका. यानंतर ब्लीच केल्यानंतर लावायच्या क्रीमने चेहऱ्याला मसाज करा. ब्लीच १५ मिनिटांपेक्षा अधिक काळ ठेवल्यामुळे त्वचेचा दाह होऊ शकतो. ब्लीचमधल्या काही घटकांमुळे त्वचेवर पुरळ येऊ शकतं. त्यामुळे ब्लीच फार वेळ ठेऊ नये.

आजीबाईचा बटवा

### पोषक घटकांनी समृद्ध खजूर

थंडीत खजूर खाल्ला जातो. खजूर आरोग्यदायी आणि पोषक घटकांनी समृद्ध आहे. खजुरात फायबर, प्रथिनं, पोटॅशियम, मॅग्नेशियम, तांबं, मँगनिज, लोह आणि बी ६ हे जीवनसत्त्व हे घटक असतात. खजुरांमुळे झटपट ऊर्जा मिळत असल्यामुळे अशक्तपणा दूर करण्यासाठी त्यांचं सेवन करायला हवं. खजूर शक्यतो सकाळच्या वेळेत खायला हवा. खजुरात विरघळणारे फायबर असल्यामुळे पचनसंस्थेच्या तक्रारी, बद्धकोष्ठता दूर होते. खजुरातल्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. खजुरातले घटक कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी करून हृदयाला बळकटी देतात. खजुरांच्या नियमित सेवनामुळे हाडांना बळकटी मिळते. यातल्या 'क' जीवनसत्त्वामुळे हाडांची वाढ करण्याच्या प्रक्रियेतही खजुराची महत्त्वाची भूमिका असते. सकाळी व्यायाम करणारे दिवसाची सुरुवात खजुराने करू शकतात. खजुरामुळे मेंदूला चालना मिळते. विस्मरणाची तीव्रता कमी होते.





# सेन्सेक्स-निफ्टी सपाट बंद

## गुंतवणूकदारांनी फक्त 33 हजार कोटी कमावले

**मुंबई, दि. १०प्रतिनिधी**

सेन्सेक्सच्या साप्ताहिक समाप्तीच्या दिवशी आज देशांतर्गत बाजारात मोठी मंदी होती. क्षेत्रनिहाय संमिश्र कल होता. निफ्टी आयटी दीड टक्क्यांहून अधिक वाढीसह बंद झाला. तर दुसरीकडे निफ्टी रिअ‍ॅल्टीमध्ये एक टक्क्यांहून अधिक घसरण झाली. सलग चार दिवसांच्या वाढीनंतर आज बाजारात बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप केवळ ३३.५ हजार कोटींनी वाढले आहे. म्हणजेच गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ३३.५ हजार कोटींनी वाढ झाली आहे.

बीएसई सेन्सेक्स आज ५३.४९ अंकांनी म्हणजेच ०.०६ टक्क्यांनी घसरून ८२३९१.७२ वर बंद झाला. तर निफ्टी ५० फक्त १.०५ अंकांनी वाढून २५१०४.२५ वर बंद झाला. एक दिवस आधी म्हणजे ९ जून २०२५ रोजी बीएसईवर सूचीबद्ध सर्व शेअर्सचे एकूण मार्केट कॅप ४,५५,०६,५०१.७५ कोटी रुपये होते. आज, म्हणजे १० जून रोजी, शेअर बाजारातील व्यवहार बंद होताना ते ४,५५,४०,०४९.११ कोटींवर पोहोचले. याचा अर्थ गुंतवणूकदारांच्या भांडवलात ३३,५४७.३६ कोटींची वाढ झाली आहे.



**सेन्सेक्स 82,391**

**निफ्टी 25,104**

सेन्सेक्समधील ३० शेअर्सपैकी १६ शेअर्स वधारून बंद झाले. टेक महिंद्रा, टाटा मोटर्स आणि इन्फोसिसमध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. दुसरीकडे, एशियन पेंट्स, बजाज फायनान्स आणि टाटा स्टीलच्या शेअर्समध्ये आज सर्वात मोठी घसरण दिसून आली.

आज बीएसईवर ४१७२ शेअर्सची खरेदी-विक्री झाली. यामध्ये २२३२ शेअर्स वधारले. तर १८०५ मध्ये घसरण झाली. १३५ शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही. याशिवाय १३७ शेअर्स एका वर्षाच्या उच्चांकावर आणि ३३ शेअर्स एका वर्षाच्या नीचांकी पातळीवर पोहोचले. १० शेअर्स अप्पर सर्किटवर आणि ६ शेअर्स लोअर सर्किटवर पोहोचले.

# पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात प्रमुख अभियंत्यांची नियुक्ती करा

## इंजिनीअर्स असोशिएशनच्यावतीने पालिका आयुक्तांना पत्र

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेत सद्यस्थितीत नागरी सेवेची ८० टक्के कामे अभियंता संवर्ग आणि महापालिका कामगार यांच्यामार्फत केली जात आहेत. दररोज पाणीपुरवठा, मलनिःसारण वाहिन्या, रस्ते व पुलांची डागडुजी, रुग्णालये, स्मशानभूमी आदी आवश्यक सेवेतील कामे अभियंते व कामगार पार पडत आहेत. तसेच, अभियंत्याकडे प्रभावीपणे काम करण्याची क्षमता असल्यामुळे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात प्रमुख अभियंता हे पद निर्माण करावे. तसेच, त्यावर तातडीने नियुक्ती करावी, अशी मागणी



महापालिकेच्या अभियंता संवर्गातून केली जात आहे. तसेच या निवेदनाचे पत्र इंजिनिअर्स असोशिएशनच्या वतीने पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांना देण्यात आले.

मुंबई महापालिकेतील आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्वाचे पद सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने नियुक्त करून चालविला जात आहे. यंदा मोसमी पावसाच्या पहिल्या दिवशीच मुंबईची तुंबई झाली होती. परिणामी मुंबईकरांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला होता. आपत्ती व्यवस्थापन विभागातील नियोजनशून्यता या परिस्थितीला जबाबदार असल्याचा आरोप म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनने केला आहे.

**अभियंत्यांवर कामाचा वाढता ताण**

मुंबई महापालिकेतील अभियंत्यांना विविध कामांचा अनुभव असूनही आपत्ती व्यवस्थापन विभागात त्याच्यासाठी जागा नसणे, हे अन्यायकारक आहे. महापालिकेत अभियंत्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध अभियंत्यांवर कामाचा ताण पडत आहे. असे असूनही अभियंते विना तक्रार काम करत आहेत. भविष्यात आपत्ती व्यवस्थापनात होणाऱ्या त्रुटी टाळण्यासाठी महापालिकेच्या आस्थापनेवरील प्रमुख अभियंता (आपत्ती व्यवस्थापन) हे पद निर्माण करावे. तसेच, तातडीने त्या पदावर अभियंत्याची नियुक्ती करावी, अशी मागणीसुध्दा इंजिनीअर्स असोसिएशनने केली.

# राजाच्या हत्येनंतर सोनम आली होती इंदूरला

**इंदूर,दि. १० वृत्तसंस्था**

राजा रघुवंशी हत्याकांड प्रकरणी मोठा खुलासा समोर आला आहे. हत्येनंतर सोनम घटनास्थळापासून १० किमी दूर तिन्ही आरोपींसोबत बोलताना सीसीटीव्हीत कैद झाले आहे. त्यानंतर २५ तारखेला ती शिलांगहून सिलिगुडीमार्गे ट्रेनने इंदूरला पोहचली. इंदूरमध्ये राज सोनमला भेटला. सोनममध्ये इंदूरमध्येच भाड्याने खोली घेऊन राहिली होती. त्यानंतर एका ड्रायव्हरने तिला यूपीला पाठवले होते. वाराणसीहून ती गाजीपूरला पोहचली होती. गुवाहाटी रेल्वे स्टेशनजवळ हत्येत वापरलेले हत्यार सापडले आहे. हनीमूनवेळी सोनमने अनेक फोटो अपलोड केले नाहीत ज्यातून पोलिसांना संशय येईल हे तपासात पुढे आले आहे.

सोनमने पतीच्या हत्येनंतर त्याला दरीत कोसळताना पाहिले आणि त्याच्यात मोबाईलवरून २ वाजून १५ मिनिटांनी एक पोस्ट केली होती.



ज्यात लिहिले होते की, सात जन्मो का साथ है...ही पोस्ट तिने राजा जिवंत आहे हे दाखवण्यासाठी केली होती. हत्येनंतरही राजाचे अकाऊंट सुरू होते. राजाची हत्या २३ मे रोजी झाली. त्याचदिवशी हे जोडपे गायब झाल्याचे समोर आले होते. दुपारी २.१५ मिनिटांनी ही पोस्ट अपलोड करण्यात आली होती.

४ जूनच्या आसपास पोलिसांना राजाच्या हत्येत सोनमचा सहभाग असल्याची शंका आली. घटनास्थळी जे जॅकेट सापडले ते आरोपी आकाशचे होते. तिथेच सोनमचे रेनकोट मिळाले होते. मोबाईल स्क्रीन मिळाले ते राजाचे होते. सोनमने तिचे रेनकोट आकाशला दिले होते. ज्यावर रक्ताचे डाग लागले होते. आकाशने ते तिथेच फेकले. आनंदच्या अटकेवेळी त्याने तेच कपडे घातले होते. राजावर पहिला वार आरोपी विशालने केल्याचे कळतंय.

राजा आणि सोनम हनीमूनसाठी मेघालयला गेले होते. दोघांनीही ११ मे रोजी लग्न केले आणि २० मे रोजी हनीमूनसाठी निघाले. ३ दिवसांनी २३ मे रोजी एका होम स्टेमधून चेकआऊट केल्यानंतर दोघे गायब झाले. त्यांनी भाड्याने घेतलेले वाहन एका गावात बेवारस अवस्थेत सापडले. अनेक दिवसांच्या तपासानंतर २ जून रोजी राजा रघुवंशीचा मृतदेह खोल दरीत सापडला तर सोनम बेपत्ता होती. पोलिसांना एक चाकूही सापडला जो राजाच्या हत्येत वापरला होता. २ दिवसांनी पोलिसांनी एक रेनकोट सापडला जो खूप मोठा होता. त्यातून गायब झालेल्या पत्नीचा शोध घेणे सोपे झाले.

# हुंड्यात मागितली किडनी

## नकार दिल्याने घराबाहेर काढले

**मुझफ्फरपूर, दि. १० वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून हुंडाबळीच्या बातम्या सातत्याने येत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये दागदागिने, मालमत्ता, रोख रक्कम आदींच्या रूपात हुंडा मागितला जातो. मात्र बिहारमधील मुझफ्फरपूर येथे हुंड्याचं एक धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. मुझफ्फरपूर शहरातील मिठनपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिप्ती नावाच्या एका महिलेने पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि सासरच्या मंडळींवर गंभीर आरोप केले. सासरच्या मंडळींनी मला माहेरहून हुंडा आणण्यास सांगितले. तसेच मी जेव्हा हुंडा आणू शकले नाही तेव्हा सासरच्या मंडळींनी पतीच्या उपचारांसाठी किडनी देण्याची मागणी केली. मी जेव्हा किडनी देण्यास मनाई केली तेव्हा मला मारहाण करण्यात आली. तसेच घरातून बाहेर काढण्यात आले, असा आरोपही या महिलेने केला.

दिप्ती हिने सांगितले की, माझं लग्न २०२१ मध्ये बोचहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका तरुणासोबत झालं होतं. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस आनंदात गेले. मात्र काही महिन्यांनंतर सासरच्या मंडळींचं वर्तन बदलू लागलं. ते माहेरहून पैसे, दुचाकी आणण्यासाठी माझ्यावर सतत दबाव आणू लागले. तसेच मी कुठल्याच कामाची राहिलेली नाही, असे टोमणे मारू लागले.

यादरम्यान, लग्नाला दोन वर्षं झाल्यानंतर माझ्या पतीची एक किडनी खराब झाली असल्याचे मला समजले. त्यानंतर सासरच्या मंडळींनी तुला जर माहेरहून पैसे आणता येत नसतील तर तुझी एक किडनी तुझ्या पतीला दे, असे सांगून तगादा लावला. मात्र मी जेव्हा किडनी देण्यास नकार दिला तेव्हा त्यांनी मला घराबाहेर काढले.

दरम्यान, दिप्ती हिने माहेरी गेल्यानंतर महिला पोलीस ठाण्यात धाव घेत तक्कार नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही पक्षांना बोलावून प्रकरण सामोपचाराने मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र तडजोड होऊ शकली नाही. दिप्ती हिला घटस्फोट हवा आहे. मात्र तिचा पती तिला घटस्फोट देण्यास तयार नाही, त्यामुळे घटस्फोटावर दोघांचीही सहमती होऊ शकली नाही. त्यानंतर या महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तसेच पतीसह सासरच्या चार जणांवर आरोप करत त्यांना आरोपी बनवले. आता या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# डीजीएमओ जनरल घई यांना पदोन्नती

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकला चोख प्रत्युत्तर दिले. भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या बहावलपूर, मुरीदके येथील अनेक दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. तसेच, पाकिस्तानच्या ड्रोन हल्ल्यांनाही जोरदार प्रत्युत्तर दिले. दरम्यान, या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावणारे लेफ्टनंट जनरल राजीव घई यांना पदोन्नती मिळाली आहे.

राजीव घई सध्या लष्करी ऑपरेशन्सचे महासंचालक, म्हणजेच डीजीएमओ म्हणून कार्यरत आहेत. आता त्यांना उप लष्करप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. ते दोन्ही पदांवर कायम राहतील. ऑपरेशन सिंदूर दरम्यान नष्ट झालेल्या पाकिस्तानच्या दहशतवादी तळांची सविस्तर माहिती देण्यासाठी राजीव घई मीडियासमोर आले होते.

# राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनीच सत्यजीत पाटणकरांचा भाजपमध्ये प्रवेश

**सातारा, दि. १० प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिनीच भाजपने खासदार शरद पवार यांना मोठा धक्का दिला. साताऱ्यातील पाटण तालुक्यातील शरद पवार गटाचे नेते सत्यजीत पाटणकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी केलेल्या वक्तव्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. बच्चू, बच्चू म्हणून डच्चू देऊन बाजूला सारू नका म्हणजे झालं, असे वक्तव्य उदयनराजे भोसले यांनी केले आहे.



सत्यजीत पाटणकर यांच्या पक्ष प्रवेशावेळी उदयनराजे भोसले म्हणाले की,पाटणकर यांचा आज प्रवेश होतोय, त्यांचे पक्षात स्वागत. अनेक वर्षापासून सत्तेचे केंद्रीकरण झालेलं पाहायला मिळालं. बोलणं सोपं असतं, आचरणात आणणं कठीण असतं. पहिले लोकं दगडाला शेंदूर लावला की निवडून द्यायचे. मात्र आता तशी परिस्थिती उरलेली नाही. बालेकिल्ला म्हणत लोकांना, विकास कामांना वंचित ठेवलं, असे म्हणत त्यांनी खासदार शरद पवारांवर निशाणा साधला. मात्र आपल्या जिल्ह्याला न्याय देण्याचा खरा प्रयत्न कोणी केला असेल तर भाजपने केला. भाजप हा पक्ष नाही तर कुटुंब आहे. निवडणुकीपूर्वी आम्ही हे करू ते करू आणि निवडणुका संपल्या की लोकं विसरतात. पाटणकर हे माझे कॉलेजपासूनचे मित्र आहेत. पश्चिम महाराष्ट्र हा आता कोणाचा बालेकिल्ला राहिलेला नाही. हा फक्त भाजपचा किल्ला झाला आहे, असा टोला त्यांनी यावेळी शरद पवारांना लगावला. तर हा प्रवेश मागेच होणार होता, त्या भागातील लोकांचा छळ होतं होता, कामं होत नव्हती, त्यानंतर आज हा निर्णय झाल्याचे देखील त्यांनी यावेळी म्हटले.

सातारा जिल्हाध्यक्ष अतुलबाबा भोसले यांनी बच्चू म्हणून पाटणकरांचा उल्लेख केला. त्यावेळी उदयनराजेंनी बच्चू, बच्चू म्हणून डच्चू देऊन बाजूला सारू नका म्हणजे झालं, असं मिश्कील वक्तव्य केलं. यानंतर सभागृहात एकच हास्यकल्लोळ झाल्याचे पाहायला मिळाले. उदयनराजे भोसले यांच्या वक्तव्याची आता जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

भाजप कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, साताऱ्यातून भाजपमध्ये हाडामासाचा पदाधिकारी सहभागी होतं आहे, याचा आनंद आहे. सरकारच्या योजना प्रामाणिकपणे राबवणारा हा पक्ष आहे. आपण ज्या विश्वासाने पक्षात प्रवेश केला आहे, त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असे वक्तव्य त्यांनी केले.


# 'मैने प्यार किया फिरसे' चित्रपटाचा भव्यदिव्य मुहूर्त संपन्न

दोन दशकापूर्वी सलमान खान भाग्यश्री यांच्या मैने प्यार किया या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला होता. आता अनेक वर्षानंतर याच शीर्षकाचा परंतु वेगळ्या कलाकारांच्या संचात नवा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पर्ल ग्रुप ऑफ कंपनी आणि सिनेबस्टर मॅगझीन या कंपनीचे मालक रॉनी रॉड्रिक्स यांनी आता चित्रपट निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले असून त्यांच्या पहिल्या वाहिल्या सिनेमाचा मैने प्यार फिरसे किया चा भव्यदिव्य मुहूर्त नुकताच मुंबईत एका शानदार सोहळ्यात संपन्न झाला. चित्रपटाच्या या मुहूर्ताला जेष्ठ अभिनेते धर्मेंद्र आवर्जून उपस्थित होते. तर अरबाज खान,विद्या माळवदे, राजपाल यादव या कलाकारासोबतच चित्रपटाचे संगीतकार दिलीप सेन आणि गायक उदित नारायण आणि नृत्य दिगदर्शक गणेश आचार्य देखील उपस्थित होते. याच सोहळ्यात रॉनी यांच्या जुळ्या मुलांचा चार्ल्स आणि काढेन यांचा वाढदिवस देखील मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. निर्माता रॉनी रॉड्रिक्स यांनी त्यांचा मुलगा काढेन यांच्यासह फटमार करून चित्रपटाचा मुहूर्त केला. पीबीसी मोशन पिक्चर्स लिमिटेड या बॅनरच्या मैने प्यार फिर से किया या चित्रपटाचे दिगदर्शन साबीर शेख करणार आहेत. तर एक्शन दिग्दर्शन हिमांशू झुनझुनवाला करणार आहेत. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.



**सिनेरंग**

**लोकरंजन**



# 'समसारा' चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या "समसारा" या हॉरर चित्रपटाची टीजरमुळे उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, नुकत्याच लाँच करण्यात आलेल्या ट्रेलरमुळे या चित्रपटाविषयीची उत्कंठा आता अजूनच शिगेला पोहोचली आहे. चित्रपटातील प्रमुख व्यक्तिरेखांचा इतिहास काय? त्यांच्या आयुष्यातलं गूढ काय? असे अनेक प्रश्न या ट्रेलरने निर्माण केले असून, "समसारा" हा चित्रपट येत्या २० जूनला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. संचय प्रॉडक्शन्सच्या पुष्कर योगेश गुप्ता यांची निर्मिती असलेल्या "समसारा" या चित्रपटाचं दिग्दर्शन सागर लढे यांनी केले आहे.

जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यान घडणारी एक गूढरम्य गोष्ट समसारा हा चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. गूढरम्य गोष्टीला अनुभवी अभिनेत्यांची साथ लाभली आहे. सायली संजीव, ऋषी सक्सेना, डॉ. गिरीश ओक, पुष्कर श्रोत्री यांच्या नेमक्या व्यक्तिरेखा, त्यांना असलेला गूढ इतिहास अत्यंत रंजक असल्याचं ट्रेलरमधून जाणवतं आहे. त्याशिवाय पार्श्वसंगीत, छायांकन, व्हिज्युअल इफेक्ट्सही उत्तम दर्जाचे असल्याचं ट्रेलर मधून जाणवतं आहे. त्यामुळेच चित्रपटाचा ट्रेलर अत्यंत गुंतवणारा, भयाचा आणि रहस्याचा अनुभव देणारा असल्याचंही दिसतं आहे. मराठी चित्रपटांत हॉरर प्रकार फारसा हाताळला गेलेला नसल्यानं "समसारा" एक वेगळा प्रयोग ठरणार आहे यात शंका नाही.

# फारुक अब्दुल्ला यांचा 'वंदे भारत'ने प्रवास

## चिनाब नदीवरील पुल येताच झाले भावुक

**श्रीनगर, दि. १० वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच कटरा आणि श्रीनगर यादरम्यान धावणाऱ्या दोन खास वंदे भारत रेल्वे ट्रेनना हिरवा झेंडा दाखवला. या ट्रेनमुळे प्रवासाचा



कालावधी २-३ तासांनी कमी झाला आहे. तसेच काश्मीर खोऱ्याशी सर्व ऋतूंमध्ये संपर्क राखता येईल, असा एक नवा मार्ग उपलब्ध झाला आहे. यातच जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारुख अब्दुल्ला यांनी याच वंदे भारत ट्रेनमधून प्रवास केला. ही ट्रेन चिनाब नदीवरील पुलावर येताच फारूक अब्दुल्ला भावुक झाल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फारुक अब्दुल्ला वंदे भारत ट्रेनमधील या प्रवासादरम्यान बोलताना सांगितले की, ही वंदे भारत ट्रेन जम्मू-काश्मीरच्या लोकांसाठी सर्वात मोठी भेट आहे. नौगाम (श्रीनगर) रेल्वे स्टेशनवरून फारुक अब्दुल्ला यांनी वंदे भारत ट्रेनमधून प्रवासाला सुरुवात केली आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा रेल्वे स्टेशनपर्यंत प्रवास केला. या ट्रेनमुळे केवळ आमचे पर्यटनच नाही तर आमचा व्यापारही वाढेल. आमची उत्पादने कन्याकुमारी, पटना, कोलकाता, मुंबई येथे पोहोचतील. याचा आम्हाला खूप फायदा होईल. आमचे स्वप्न होते की, एक दिवस जम्मू-काश्मीर देशाच्या इतर भागांशी जोडले जाईल आणि हे स्वप्न या ट्रेनमुळे पूर्ण होत आहे. या प्रकल्पावर काम करणाऱ्या सर्व लोकांचे आभार मानू इच्छितो, असे फारुक अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

# विद्यार्थ्याकडून शाळेत अंदाधुंद गोळीबार, ९ ठार

**ग्राझ, दि. १० वृत्तसंस्था**

ऑस्ट्रियातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर ग्राझमधील एका शाळेत गोळीबाराची घटना समोर आली आहे. शाळेतील एका विद्यार्थ्यानेच हा गोळीबार केला आणि शेवटी त्याने स्वतःवरही गोळी झाडली. ग्राझ शहरामध्ये झालेल्या या गोळीबारात ७ विद्यार्थ्यांसह ९ जणांचा मृत्यू झाला आहे.

ग्राझमधील एका शाळेतील विद्यार्थी हा बंदूक घेऊन शाळेत पोहोचला. त्यानंतर त्याने समोर दिसेल त्याच्यावर अंदाधुंद गोळीबार सुरू केला. यानंतर या विद्यार्थ्याने वॉशरूममध्ये जाऊन स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. पोलिसांनी सांगितले की, मंगळवारी सकाळी १० वाजता (स्थानिक वेळेनुसार) शाळेच्या इमारतीतून गोळ्यांचा आवाज ऐकू आला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस त्या ठिकाणी पोहोचले. त्यानंतर पोलिसांनी लोकांना परिसरापासून दूर राहण्याचा आणि अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करण्याचा सल्ला दिला. पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर पोस्ट केले की, शाळा रिकामी करण्यात आली आहे आणि सर्वांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. त्यांनी पुढे सांगितले की परिस्थिती नियंत्रणात आहे आणि आता कोणताही धोका नाही. ऑस्ट्रियाचे ग्राझ शहर देशाच्या आग्नेय भागात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या गोळीबारात मृतांमध्ये ७ विद्यार्थी, एक शाळेचा कर्मचारी आणि स्वतः गुन्हेगाराचा समावेश आहे. शाळेतील गोळीबाराची चौकशी करण्याची जबाबदारी स्पेशल टास्क फोर्सकडे देण्यात आली आहे. ऑस्ट्रियाचे गृहमंत्री देखील ग्राझ शहरासाठी रवाना झाले आहेत. पोलिसांनी लोकांना शांत राहण्याचे आणि अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. पोलिसांनी सांगितले की काही लोक जखमी देखील झाले आहेत, त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# "झी मराठी" एक नवे रूप, नव्या नात्यांसह प्रेक्षकांच्या भेटीला

गेली २६ वर्ष महाराष्ट्राच्या घराघरांत प्रेम मिळवणारी, प्रत्येकाला आपलीशी वाटणारी 'मी मराठी झी मराठी' असं अभिमानाने म्हणत महाराष्ट्र आणि देशविदेशात जिथे जिथे मराठी माणूस आहे तिथे आपला एक वेगळा ठसा उमटवला. आता हीच आपली झी मराठी नवीन ओळख आणि एक नवा अध्याय सुरू करत आहे. 'सदैव तुमची झी मराठी' , या ओळींमागे आहे एक साधा पण खोलवर जाणा-या भावनेचा विचार. "सदैव तुमची" ही भावना आहे आपलेपणाची, एकत्रतेची आणि छोट्या-छोट्या क्षणांमधून निर्माण होणाऱ्या मोठ्या भावनिक बंधांची. झी मराठी आपल्या महाराष्ट्रातील संस्कृती, भावना, आणि दैनंदिन जीवनातल्या सत्य घटनांना सिनेमॅटिक रूप देते.

या संदर्भात झी मराठीच्या चीफ चॅनेल ऑफिसर व्ही. आर. हेमा म्हणाल्या, "सदैव तुमची झी मराठी हे वाक्यच आपल्या नात्यांमधील भावनिक गुंतवणूक दाखवते. इथं एकमेकांच्या सुखदुःखात




खांदा देऊन उभं राहणं ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. झी मराठी ही केवळ एक वाहिनी नाही, तर घराघरातली आपुलकीची एक भावना आहे. आता प्रेक्षकांसोबतचे नातं आणखी दृढ करण्यासाठी 'झी मराठी' एका नवीन रूपात नवीन ढंगात प्रेक्षकांसमोर आली आहे .या प्रवासात नव्याने सुरु झालेली 'देवमाणूस' आणि लवकरच सुरु होणारी 'कमळी' ह्या मालिका प्रेक्षकांना नक्कीच भावतील. पुन्हा नव्याने सुरु होणारा 'चला हवा येऊ द्या'* हा कथाबाह्य कार्यक्रम सुद्धा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल यात शंकाच नाही. हे आणि असे अनेक नवनवीन सरप्राइझेस येत्या वर्षात झी मराठी तुमच्यासमोर घेऊन येणार आहे." झी मराठी ही लोकांच्या दैनंदिन आयुष्याचा एक भाग बनली आहे. इथे झी मराठी पाहिली जातेच, पण ती अनुभवलीही जाते. या नव्या प्रवासात आपली साथ हेच आमचं बळ आहे."

या माध्यमातून झी मराठीने आपल्या प्रेक्षकांसोबतचं नातं आणखी घट्ट केलं आहे आणि एक असा सांस्कृतिक क्षण निर्माण केला आहे, जो प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करून जाईल.

**टेलीरंग**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# १४ चिनी नागरिकांचा जीव वाचला; चीनने मानले भारतीय नौदल आणि मुंबई कोस्ट गार्डचे आभार

**कोची, दि. १० वृत्तसंस्था**

केरळच्या किनारपट्टीनजीक सिंगापूरच्या मालवाहतूक जहाजाला लागलेली आग विझवण्याचं काम अद्याप सुरू आहे. भारतीय नौदलाचे आयएनएस सूरतने या जहाजावरील १८ सदस्यांना सुरक्षित बाहेर काढले आहे तर ४ क्रू मेंबर्स अजूनही बेपत्ता आहेत. या जहाजाला रविवारी आग लागली होती. मागील २ दिवसांपासून भारतीय नौदल, कोस्ट गार्डसह संयुक्त अभियानाद्वारे मोहिम हाती घेण्यात आली आहे.



भारतीय तटरक्षक दलाची जहाजे सचेत आणि समुद्र प्रहारी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. तटरक्षक दलाचे डोर्नियर विमान बचाव कार्याचे हवाई सर्वेक्षण करत आहे. मंगळवारी तटरक्षक दलाचे जहाज समर्थ देखील बचाव कार्यात सामील झाले. सोमवारी केरळ किनाऱ्यापासून सुमारे ४४ नॉटिकल मैल अंतरावर सिंगापूरच्या एका मालवाहतूक जहाजाचा अपघात झाला. कोलंबोहून मुंबईला जाणारे सिंगापूरचा झेंडा असलेले जहाज एमव्ही वान है ५०३ अचानक आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आगीमुळे जहाजात मोठा स्फोट झाला.

या जहाजावर जवळपास ६५० कंटेनर आहेत, ज्यातील अनेक कंटेनर समुद्रात पडलेत. ज्या वेगाने ही आग भडकत आहे त्यामुळे जहाजातील कंटेनर्समध्ये एखादं ज्वलनशील रसायन असू शकतो असं म्हटलं जाते. सध्या जहाज कंपनी कंटेनर्स मालकांकडून त्यांनी ठेवलेल्या सामानाची माहिती मागवत आहे. नौदलाचं जहाज आयएनएस सुरतने आग लागलेल्या जहाजावरील १८ क्रू मेंबर्सना वाचवले आहे. काही क्रू मेंबर्स जखमी झाले आहेत आणि त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. इतर चार जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. क्रू मेंबर्सना मंगळुरू बंदरात आणण्यात आले आहे. जखमींवर कुंतिकाना येथील एजे रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101